म. ग्रं. सं. ठाणें

विषय. नाट्य

संग्रहालय क्रमांक १२५८

लेखक ए. ग. गांडारे

सन १८८३

पुस्तकाचें नांव अनुराग पत्रिका

८८ / नाट्य

महाराष्ट्रकोकिल मा. पुस्तकांत छापून प्रसिद्ध झालेली

# अनुरागपत्रिका.

ही

लहानशी गोष्ट,

**एकनाथ गणेश भांडारे,**

तार मास्तर, भुसावळ,

ह्यांनीं

सुशिक्षित स्त्रीपुरुषांच्या मनोरंजनार्थ लिहिली.

[ सर्व प्रकारचे हक राखून ठेविले आहेत. ]

प्रकाशक :

**मराठी लिटररी सोसायटी,**

गिरगांव पोस्ट, मुंबई.

मुंबई:—"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापिली.

सप्टेंबर सन १८९३.

किंमत अडीच आणे.

[ डिसेंबर १८९३ अखेर घेणारांस किंमत फारच कमी केली आहे. ]

हिंदुस्थानची राजकीय स्थिति दाखविणारी मजेदार मराठी कादंबरी.

# हिंद आणि ब्रिटानिया.

ही कादंबरी मूळची गुजराथी भाषेंत असून ती इतकी अद्वितीय व सर्वोत्कृष्ट झाली आहे कीं, हिंदुस्थानांतील सर्व वर्तमानपत्रांनीं तिची वाहवा केली आहे एवढेंच नव्हे पण अमेरिका, फ्रान्स, एशिया, इंग्लंड, इत्यादि देशांतील नामांकित पत्रकारांच्याही प्रशंसनेस ती पात्र झाली आहे. ह्या कादंबरीमध्यें लॉर्ड मेयो, लॉर्ड लॉरेन्स, लॉर्ड मनरो, लॉर्ड केनबोर्न, सर जॉन के, कर्नल मेडोज टेलर, कर्नल म्यालिसन, डाक्टर हंटर, फॉसेट, कॉब्डेन, मार्समन, ब्राईट, एडविन आर्नाल्ड, कॉटन वगैरे महापुरुषांचीं हिंदुस्थानाविषयींचीं मतें फार चातुर्यानें, हिंदुस्थान आणि इंग्लंड ह्या दोन स्त्रिया कल्पून, त्यांच्या मुखांतून दिग्दर्शित केलीं आहेत. ह्यांतील विषय इतका महत्वाचा आहे कीं, प्रत्येक राष्ट्रहितचिंतकानें त्याचें अवश्य मनन केलें पाहिजे. ह्या कादंबरीच्या प्रारंभीं उदार मूर्ति लॉर्ड रिपन ह्यांचें चित्र व शेवटीं कांहीं सुंदर पद्यें जोडलीं आहेत. प्रत्येक सहृदय वाचकास ही कादंबरी वाचतांना खरोखर स्वदेशस्थिति पाहून नानाप्रकारच्या महत्वाच्या कल्पना आल्यावांचून राहणार नाहींत! कादंबरीच्या नमुन्याचें सुरस वर्णन करून त्यांत राजकीय स्थितीचा देखावा हुबेहुब वठविण्याची ग्रंथकर्त्याची शैली खरोखर अत्यंत प्रशंसनीय आहे. ह्या कादंबरीवर राजद्रोहाचा आरोप येऊन तिचा खुद्द गव्हरनर-जनरलच्या कौन्सिलांत विचार होऊन ती पूर्ण राजनिष्ठ ठरली आहे. ज्या पुस्तकाबद्दल एवढा विचार झाला आहे, व जें सर्व पृथ्वीवर अत्युत्तम ह्मणून ठरलें आहे, आणि इंग्रजी, बंगाली व उर्दु इत्यादि भाषांत ज्याचीं भाषांतरें होत आहेत, त्याचें मराठी भाषांतर किती वाचनीय व विचारणीय झालें असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. छपाई अत्युत्कृष्ट व कागद मोहरदार वापरला आहे. तेव्हां हें अंतर्बाह्य सुंदर पुस्तक प्रत्येक महाराष्ट्रभाषा जाणणारानें अवश्य संग्रहीं ठेवावें अशी आमची त्यास विनंति आहे.

पुस्तकाचा सांचा डेमी अष्टपत्री असून पृष्ठसंख्या ३१५ आहे. किंमत रु. १॥ असून ट. ख. ०।≈ आणे जास्त पडेल.

**डिसेंबर १८९३अखेर घेणारांस ट.ख.सह किं. फक्त रु. १। पडेल.**

☞ फारच थोड्या प्रति शिल्लक आहेत, करितां मागविणारांनीं त्वरा करावी.

**पत्ता—मराठी लिटररी सोसायटी, गिरगांव पोस्ट मुंबई.**

## प्रस्तावना.

सुशिक्षणाचा परिणाम चांगला झाल्यास नवल नाहीं. परंतु वाईट झाल्यास मात्र आश्चर्य आहे. तथापि त्यांत आश्चर्य वाटण्याचीही आवश्यकता नाहीं. कारण ह्या जगांत कांहीं कांहीं गोष्टी अशा आहेत कीं, त्यांचा परिणाम कधींही वाईट होऊं शकत नाहीं. सुधापानानें मनुष्य मेल्याचें, सुशिक्षणानें अपकीर्ति झाल्याचें, सदाचारानें दुःखांत पडल्याचें, संतसमागमानें नरकवास भोगल्याचें, किंवा रत्नालंकारांनीं शोभा हरण केल्याचें आजपर्यंत कधींही कोणी ऐकलें नसेल. कदाचित् ऐकलें असें गृहित धरून चाललें तर त्याचें कारण "भ्रमवी श्रमवी मळवी; पळवी सत्कीर्तिला दुराग्रह रे!" या मयुरोक्तींत सांपडेल. ह्मणून भलत्याच गोष्टीविषयीं कोणीं कधींही दुराग्रह धरूं नये. शिक्षणानें पुरुषवर्गावर परिणाम चांगला होतो आणि स्त्रीवर्गावर उलट होतो, असें नाहीं. तो चांगला अथवा वाईट होणें ज्याच्या त्याच्या आचारविचारावर अवलंबून आहे. ह्मणून कोणतीही गोष्ट करणें झाल्यास ती विचारानें करावी. तींत अविचार झाल्यास पुढें पश्चात्ताप होतो. तो होऊं नये, व सुशिक्षित व निरपराधी स्त्रिया, पुरुषांच्या अविचारपिशाच्चिकेस विनाकारण बळी पडूं नयेत, ह्मणून ह्या दोन ओळी प्रिय वाचकांस सादर केल्या आहेत.

**ए. ग. भांडारे.**

## अभिप्राय.

**रा. रा. एकनाथ गणेश भांडारे,** यांस

वि. वि. ॲरिस्टॉटलच्या मतें दुःखपर्यवसायी नाटकाचा मुख्य उद्देश एखाद्या विकाराच्या परिणामाचें हुबेहुब वर्णन करून, त्या विकाराविषयीं मनुष्याच्या मनांत तिरस्कार उत्पन्न करणें, हाच असला पाहिजे. प्रस्तुत कादंबरी—या पुस्तकाला कादंबरी ह्मणतां येईल तर—मध्यें संशयखोरपणाची उत्पत्ति व तिचे परिणाम चांगल्या तऱ्हेनें दाखविले आहेत. आणि गोष्ट संपूर्ण वाचून गेल्यावर मनांत संशयखोरपणाबद्दल अप्रीति उत्पन्न होते. अशा नाटकाच्या किंवा गोष्टीच्या नायकासंबंधानें असें ह्मटलें आहे कीं, एक खेरीजकरून, सर्व गोष्टींत त्याचें वर्तन चांगलें असलें पाहिजे. ह्मणजे एक दुर्गुण नसता, तर तो खचित सद्गुणाचा केवळ पुतळाच

झाला असता; असें त्या संबंधानें ह्मणतां यावें. यामुळें होतें काय कीं आपल्या मनांत त्याचेविषयीं दया उत्पन्न झाली पाहिजे. आणि अखेरपर्यंत या दुर्गुणाच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळेंच त्याला ही दशा प्राप्त झाली याबद्दल मनाला वाईट वाटलें पाहिजे. या गोष्टीच्या नायकाची स्थिति अशीच आहे. तो सर्व सद्गुणसंपन्न आहे. त्याच्या मनाचा मोकळेपणा, स्वस्त्रीवर प्रेम, सुधारलेले विचार वगैरे पाहून मनांत त्याविषयीं प्रेम उत्पन्न होतें. आणि जेव्हां आह्मी त्याला संशयखोरपणाच्या—"सैतानाच्या"—पाशांत पडलेला पहातों त्यावेळीं त्याच्या परिणामाविषयीं हळहळ वाटते. आणि जेव्हां याच दुष्ट विकारामुळें त्याचा अंत झालेला पहातों त्यावेळीं मनांत त्याचेविषयीं अनुकंपा उत्पन्न होते. कादंबरी फार विस्तृत न झाल्यामुळें निरनिराळया पात्रांचें स्वभावचित्रांकन चांगल्या तऱ्हेनें झालें नाहीं. पण एकंदरींत "अनुरागपत्रिका" ही गोष्ट चांगलीच साधली आहे. लोभ असावा ही विनंति.

**नागपूर.** **हरि महादेव पंडित.**

---

**प्रिय मित्र एकनाथपंत भांडारे,** यांस

प्रेमपूर्वक सा. न. वि. वि. आपली "अनुरागपत्रिका" समग्र वाचून पाहिली. विषयाची रचना व भाषापद्धति फारच मनोरम आहेत. साधें वर्णन गोड भाषेंत लिहिण्याची हातोटी आपणांस बरी साधली आहे. कथानक जरी वाईट नाहीं तरी तें आपल्या भाषारमणीसारखें सुंदर आहे असें ह्मणवत नाहीं. तथापि पुस्तक एकदां हातांत घेतलें म्हणजे समग्र वाचल्याखेरीज खालीं ठेववत नाहीं हें मी स्वानुभवावरून सांगतों. ह्या 'पत्रिके'वरून आपण लौकरच सुंदर कादंबरीकार बनाल असें वाटतें. परंतु सतत परिश्रमावांचून कोणताही उत्तम गुण प्राप्त होत नसतो, हें लक्षांत ठेवावें. असो. प्रस्तुतच्या कृतिबद्दल आपलें सप्रेम अभिनंदन करून हें पत्र पुरें करतों. लोभ असावा ही सविनय विनंति.

**सातारा.** }

आपला,

**दत्तात्रय बळवंत पारसनीस.**

---

**रा. रा. एकनाथपंत भांडारे,** यांस

वि. वि. आपल्या 'अनुरागपत्रिका' गोष्टीचें संविधानक व दुसऱ्या तदंगभूत गोष्टी उत्कृष्ट जुळल्या गेल्या आहेत. चटकदारपणा असा साधला आहे कीं अखेरपर्यंत पोंहचविल्याखेरीज पुस्तक खालीं ठेववत नाहीं. भाषेच्या संबंधानें सहज होण्यासारखे फेरफार केले तर हें पुस्तक अधिक हृदयंगम होणार आहे. मराठी भाषेंत अलीकडे उत्तमांत गणल्या जाणाऱ्या कादंबऱ्यांत हीस ठेवतां येईल, इतकी हिची योग्यता आहे.

**घोटी स्टेशन,**
जी. आय. पी. रेलवे. }

आपला मित्र,

**मोरेश्वर विष्णू पळणीटकर.**

---

मराठी ग्रंथ संग्रहालय

# अनुरागपत्रिका.

**सहसा विदधीत न क्रियाम् ।**
**अविवेकः परमापदां पदम् ॥**

**—भारवि.**

**पुण्यास** एक प्रसिद्ध भिषग्वर्य आहेत. जातीचे **मराठेच.** परंतु शस्त्रक्रियेंत त्यांचा अगदीं हातखंडा. एके दिवशीं त्यांचेकडे एक रोगी आला. तो अगदीं उदास, निस्तेज व पिंवळट दिसत होता. त्याचे अंगांत शक्ति नव्हती. पण त्याचा चेहरा पाहिला ह्मणजे त्याच्या त्या मुखम्लानतेवर एक प्रकारचे अंतर्गत विकार दिसत असत. त्यामुळें त्याचे अंगावर फिक्केपणाची छाया चांगलीच पडलेली दिसे. डोळ्याचीं पातीं खालीं झालेलीं असून त्याचें तोंड जरा लांबट झालेलें दिसे. त्यानें आपल्या गळ्यांत माळेसारखें एक फडकें बांधून त्यांत उजव्या हाताचें मनगट तरंगतें धरलें होतें. त्यावरून त्याच्या त्या हाताला कांहीं इजा झाली असावी असें वाटे. कारण, तो आपलेकडून जरी दीर्घ प्रयत्न करीत असे, तरी त्या हाताच्या दुःखापासून त्याला ज्या भयंकर वेदना होत त्या त्याचे ओष्ठद्वयास प्रकंपित करून त्याचें कण्हणें व चेहेऱ्यावरील केविलवाणेपणा आपोआप बाहेर पाडीत. तो त्या वैद्याजवळ गेला, आणि मोठ्या दुःखानें व दीन मुद्रेनें ह्मणाला :—

"महाराज! आपणच कां ते प्रसिद्ध शस्त्रवैद्य?"

**वैद्य**—होय तोच मी! आपणांस काय होतें?

**रोगी**—किती तरी दुर्दैवी मी! **पुण्यांतले पुण्यांत** राहून आपणासारख्या प्रतिधन्वंतरीच्या दर्शनसुखास म्यां आजपर्यंत अंतरणें माझ्या दुर्दैवाचेंच दर्शक खरें! आतां जरी ह्या हातापासून मला असह्य इजा होत आहे, तरी तीच आपल्या दर्शनास कारण झाल्यामुळें मला एक प्रकारचा संतोषच होत आहे! आपल्या सारख्यांचें दर्शन होणें म्हणजे ओषधिपतीचाच अनुग्रह होणें आहे, यांत संशय नाहीं! काय करूं, वैद्यराज? हें दुःख आतां मला सहन होत नाहीं! अयाई!

असें ह्मणून तो रोगी डोळ्यांतून अश्रु गाळण्याच्या बेतांत आला. तथापि, वैद्यराज स्तुतिप्रिय असल्यामुळें, व ती स्तुतिही, त्या रोग्याच्या त्या एकंदर पोषाखाच्या थाटमाटावरून, नवीन मताच्या एका विद्वानाकडूनच होत आहे, असा वैद्यराजांचा कल झाल्यामुळें, ते बरेच खुललें! परंतु तो रोगी दुःखातिशयानें अगदींच त्रासला आहे! उभें रहाण्यास त्याचे अंगांत शक्ति नाहीं! व त्याचे पायही लटलटां कांपत आहेत, असें पाहून वैद्यराजांनीं त्याला एका खुर्चीवर बसविलें. तेव्हां तो त्यांस

कृतज्ञतापूर्वक ह्मणाला कीं :—"माझ्या या येण्यापासून आपणांस मोठा त्रास झाला असेल! पण काय करूं? निरुपाय झाला तेव्हां—"

**वैद्य**—( मध्येंच ) त्रास कसला आला आहे त्यांत? तुमच्या सारख्यांचा समाचार घेण्यांत आम्ही कांहीं विशेष करतों असें नाहीं! आमचें तें कर्तव्यच आहे!

**रोगी**—पहा! बुवा! मी फारच त्रासून गेलों आहें! आठ दिवस झाले, डोळ्यांला डोळा नाहीं. माझ्या या उजव्या हाताला काय झालें आहे तें पहा! कांहीं अस्थिभंग झाला आहे, कां रक्त थिजलें आहे, कां धमनीची शीर गोळा होऊन सापासारखें वेटाळें घालून बसली आहे; काय झालें आहे तें कळत नाहीं! दुःखाच्या भयंकर वेदना मात्र प्राण कासाविस करतात! पहिल्या पहिल्यानें इतकें कांहीं वाटत नव्हतें! परंतु येवढ्या सात आठ दिवसांतच त्यानें विशेष उचल घेतली आहे! काय सांगूं, वैद्यराज? हें जळजळणें व ह्या तिडका प्रत्यक्ष शत्रूला सुद्धां नसाव्या! माझ्यानें जेव्हां हें दुःख सहन करवेना, तेव्हां माझ्या बहुतेक सर्व मित्रांनीं आपलें नांव घेऊन मला आपणाकडेच जाण्याविषयीं सांगितलें! ते ह्मणाले, शस्त्रक्रियेंत मोठमोठ्या **इंग्रजी** डाक्तरांसही आपण खालीं पहावयास लावितां! आणि वैद्यराज! आपण आपल्या कलेंत निपुण असालच! परंतु मनुष्य जेव्हां एखाद्या दुखण्यानें वेडा होतो, तेव्हां त्याला जो कोणी जे कांहीं उपाय सांगतो, त्या सर्वांवर त्याचा, भावी आशेनें, विश्वास बसून तो ते उपाय करावयास लागतो. त्याप्रमाणें कोणीकडून तरी मी या दुःखांतून मुक्त व्हावें येवढ्याच हेतूनें, भाड्याची गाडी करून, आपल्या पायापाशीं आलों आहें! तारा किंवा मारा!

असें ह्मणून त्यानें त्या वैद्यराजांचे पाय धरले. व शोकाकुल होत्साता तो आपल्या नेत्राश्रूंनीं त्यांचें पादप्रक्षालन करूं लागला! ते वैद्यराज नामांकित असून कोंवळ्या मनाचे होते. व जेणेंकरून बाह्योपचारानेंच रोग्याच्या मनाला किंचित् स्वास्थ्य यावें, अशी ते बहुधां प्रत्येक रोग्याशीं वर्तणूक ठेवीत. त्याप्रमाणें ह्या रोग्याशींही ते विशेष सलगीनें वागूं लागले. त्यांनीं त्याला दोन धैर्याच्या गोष्टी सांगून ह्मटलें :—"पाहूं तुमचा हात!"

रोग्यानें मोठ्या कष्टानें त्या माळेसारख्या फडक्यांतला हात बाहेर काढून म्हटलें :—"हा पहा माझा हात! ज्या ठिकाणीं तो जळजळून मला असह्य वेदना देत आहे, तेवढा भाग जर आपण कृपाकरून कापून काढाल, तर आपले मजवर मोठे उपकार होतील! आणि आपण जर ही माझी विनंति अमान्य कराल, तर ह्या दुःखानें मी खचित वेडा होऊन जाईन!"

**वैद्य**—कोठें आहे ती दुःखाची जागा? दाखवा पाहूं?

**रोगी**—( तो हात पुढें करून ) ही पहा, ह्या येथें मनगटावर आहे!

**वैद्य**—( ती जागा बोटानें दावीत ) येथेंच कां?—

**रोगी**—( दुःखानें ओरडत ) अया—या—या—ई ! नका हो दाबूं इतक्या जोरानें!

**वैद्य**—येथेंच जळजळतें ना ?

**रोगी**—होय ! हजारों इंगळ्या लागल्या आहेत त्या येथेंच ! ह्याच जागीं !

**वैद्य**—मी जेव्हां ही जागा दाबतों तेव्हां त्या दुखऱ्या जागेवर तुम्हांला कांहीं स्पर्शज्ञान होतें काय ?

"दुःखाखेरीज दुसरें स्पर्शज्ञान तें कसलें व्हावयाचें ?" त्या रोग्यानें वैद्याला साश्रु उत्तर दिलें.

**वैद्य**—पण तुम्ही जे हे अश्रु गाळतां ते कोणत्या दुःखानें ? तुम्ही चांगले जवान-मर्द आहां ! असें असतां यःकश्चित् दुखण्यानें तुम्ही इतके बेजार होऊन बायकांसारखे अश्रु ढाळीत बसतां, हें काय ? कोणत्या दुःखापासून तुम्हांला या अन्तरवेदना होतात ?

**रोगी**—( दीन मुद्रेनें ) काय ? कोणत्या दुःखापासून ? हाय ! हाय ! तें मी कसें—

'कसें' ह्मणतांच, रोगी दचकल्यासारखा होऊन त्यानें आपली जीभ आखडती घेतल्याचा वैद्यास भास झाला. वैद्यराज मोठे चाणाक्ष होते. पण खोल पाण्यांत शिरून आपणांस काय करावयाचें आहे ? असा त्यांनीं आपल्याशीं विचार करून अधिक चिकित्सा करण्याचा नाद सोडला ! पण रोगी मात्र आपल्या दुःखांत अधिक चूर होऊन गेला, असें जेव्हां त्यांस दिसून आलें, तेव्हां त्यांस खरोखर वाईट वाटलें. त्यामुळें ते जरा आपली खुर्ची पुढें करून त्या रोग्याचा हात निमुळता पाहूं लागले; परंतु त्या ठिकाणीं त्यांना अंगरोगाचें कांहींच चिन्ह दिसेना ! तेव्हां ते त्या रोग्यास मोठ्या आश्चर्यानें ह्मणाले :—"काय हो हा चमत्कार तरी ? आजपर्यंत मी पुष्कळ रोग पाहिले परंतु असा विलक्षण रोग माझ्या पाहण्यांत कधींच आला नाहीं ! मला तर या जळजळणाऱ्या जागेवर कांहीं एक दिसत नाहीं !"

**रोगी**—मलाही पण कांहीं दिसत नाहीं ! परंतु हें जळजळणें इतकें कांहीं भयंकर आहे कीं तें सांगतां सुद्धां पुरवत नाहीं ! मी आपणांस कितीही फोडून सांगितलें तरी त्याची कल्पना आपणांस किंवा इतरांस अनुभवावांचून कशी करतां येईल ? वैद्यराज ! ह्या दुःखानें तर मी कधीं कधीं इतका वैतागून जातों कीं जमिनीवर ताडकन् डोकें आपटून प्राण द्यावा, आणि ह्या दुःखांतून मुक्त व्हावें ! असें मला वाटतें.

**वैद्य**—( साश्चर्य ) चमत्कार आहे ! ( पुन्हां त्याचा हात पाहून ) मला तर येथें विलक्षण असें कांहींच दिसत नाहीं ! हाताचा वर्ण कसा गौर आहे ? व त्यावरील रोमराजी तरी किती कोमल असून सुरेख आहे ? कातडीही असावी तशीच साफ आहे ! रुधिराभिसरणक्रिया चालावी तशीच चालूं आहे ! अस्थिभंग, रुधिर किंवा त्वग्दोष यांपैकीं माझ्या अनुभवास एकही येत नाहीं ! तुमच्या शरीराचे बाकीचे अवयव जसे निरोगी आहेत तसाच हा आहे ! तथापि ( पुन्हां पाहून ) छे ! बुवा ! मला तर हा हात अगदीं निर्दोषसा वाटतो !

**रोगी**—असें कसें होईल? ही पहा ह्या मनगटावरील जागा रक्तासारखी तांबडी-लाल दिसत नाहीं काय?

**वैद्य**—तांबडीलाल? ( चष्मा लावून ) कोठें आहे ती पाहूं?

रोग्यानें आपल्या खिशांतून 'पेन्सिल' काढली; आणि पैशाएवढी मनगटावर वाटोळी आकृति काढून दाखविली! तेव्हां "ही पहा! हीच ती प्राणघातक जागा!" असें तो वैद्यास ह्मणाला!

त्या रोग्याचें हें भाषण ऐकून वैद्यराजांची तर अक्कल गुंग होऊन गेली! वैद्यराज चाणाक्ष होते, धोरणी होते, व त्यांना अनुभवही पुष्कळ प्रकारचे होते! पण येथें त्यांच्या चाणाक्षपणाचा, धोरणांचा व अनुभवांचा उपायच खुंटल्यासारखा झाला! त्यामुळें रोगी काय म्हणतो हेंच त्यांना कळेना? तर्क कुतर्क लढवून खोल पाण्यांत शिरावें तर तें कदाचित् त्याला अधिक क्लेशकारक होईल असें जाणून, त्यांचें अंतःकरण कोमल असल्यामुळें त्यांनीं ती दिशाच सोडून दिली! ते त्या रोग्याचें मनगट लक्षपूर्वक पाहूं लागले, परंतु त्यांना कांहीं एक दिसेना! पण त्या रोग्याला त्या दुःखापासून ज्या कांहीं असह्य वेदना होत, त्या त्याचे सुंदर चेहेऱ्यावर तर त्यांना मूर्तिमंत दिसत! तेव्हां त्याचेच ह्मणण्याप्रमाणें शस्त्रक्रिया चालवून बिचाऱ्याला दुःखमुक्त करावें; असा वैद्यबुवांचा निश्चय झाला! ताबडतोब त्यांनीं नौकराकडून शस्त्रपेटिका आणविली! व आंगरख्याच्या अस्तन्या वर सारून ती पैशाएवढी जागा अत्यंत नाजुक रीतीनें कापून काढण्यासाठीं, जिच्या लखलखाटानें डोळेच दिपून जातील, अशी एक सुरेख कातर हातांत घेतली! त्या वेळेस ते रोग्यास म्हणाले:—"पहा बरें! नीट सांभाळून बसा!"—अरे पण हो! ती बाटली कोठें गेली? ही येथेंच आहे! ( ती घेऊन )—"हं हुंगा पाहूं हें औषध!"

**रोगी**—( तोंड फिरवून ) काय? क्लोरोफॉर्म?* मला याची जरूर नाहीं! मनाचा दृढ निश्चय, हाच माझा क्लोरोफॉर्म!

**वैद्य**—हें काय भलतेंच? म्यां शस्त्रक्रियेस आरंभ केल्यावर तुम्ही कदाचित् मघांसारखे 'अयाई!' करून हात मागेंपुढें कराल तर भलतेंच कांहीं होईल! कारण, अशक्ततेच्या योगानें, तुमच्यानें ही कापाकापी सहन करवणार नाहीं! ह्मणून माझें तुह्मांला असें सांगणें आहे कीं, जर म्यां शस्त्रक्रिया करावी अशी तुमची इच्छा असेल तर ही बाटली हुंगा, किंवा ती हुंगायची नसेल तर ह्या नादांत पडूं नका!

**रोगी**—वैद्यराज! शरण आलेल्यास अशा रीतीनें अडविणें आपल्या थोरपणास, उदारत्वास, व कुशलतेस योग्य आहे काय?

**वैद्य**—ठीक आहे! मला आपणांस विनाकारण अडवून काय फायदा आहे?

* शरीराचा अवयव कांपतांना वगैरे मनुष्यास बेशुद्ध करण्याकरितां एक प्रकारचें औषध हुंगण्यास देत असतात; त्याला "क्लोरोफॉर्म," ( chloroform ) असें ह्मणतात.

तुमचा निश्चय कायमचा झाला आहे, तर असें करा! तुमचा तो उजवा हात असा माझ्या डावे हातांत द्या! पण—हें पहा; मी पुन्हां तुम्हांला सांगतों! एक तर तुम्ही आपले डोळे बांधून टाका! किंवा या जखमेकडे न पाहतां मागच्या त्या भिंतीकडे पहा. भिण्याचें कांहीं एक कारण नाहीं! ही पहा; मी ही कातर घेऊन मोठ्या शिताफीनें ही पैशाएवढी वाटोळी चकती एका निमिषांत कातरून काढतों! पहा तर खरें मी काम कसें बेमालुम करतों तें?

**रोगी**—आपण माझ्याबद्दलची अगदीं धास्ती बाळगूं नका. उलट हें काम कसें करावें हेंच मी तुम्हांस सांगणार आहें! ह्या जगांत जेवढीं म्हणून दुःखें आहेत, तीं सर्व ह्या असह्य वेदनेपुढें रद्द आहेत! चला! चालवा तुम्ही आपलें काम! मी तें धिम्मेपणानें पहात बसतों!

वैद्यबुवांनीं शस्त्रक्रियेस सुरवात केली, व रोगी त्यांची ती क्रिया सावकाश पाहूं लागला! त्यांची क्रिया होत असतां रोग्यानें हूं कीं चूं कांहीं एक केलें नाहीं! तो एखाद्या पाषाणमूर्तीप्रमाणें चलनवलनरहित त्या खुर्चीवर बसलेला होता! त्याचा हात प्रकंपित झाला नाहीं! किंवा त्या क्रियेपासून आपणांस कांहीं दुःख होत आहे असेंही त्यानें दाखविलें नाहीं! भिंतीवरील चित्राप्रमाणें तो कांहीं काल अचेतन भासला! वैद्यराज शस्त्रक्रियेंत हुशारच होते! तेव्हां त्यांनीं आपलें काम मोठ्या चातुर्यानें बेमालुम शेवटास नेलें हें सांगणें नकोच! ती जागा कापून काढल्यानंतर वैद्यराज त्या रोग्यास म्हणतात:-"आतां राहिली कां इथली जळजळ?"

**रोगी**—( कृतज्ञतापूर्वक ) राहिली! सर्व दुःखांतून मी मुक्त झालों! त्या हजारों इंगळ्या—ज्या मला फणाफण नांग्या मारून अर्धमेला करीत होत्या त्या सर्व—नाहींशा झाल्या! ह्या मनगटांतून जो हा रक्ताचा पाट चालला आहे तो, बालार्काच्या आरक्त किरणाप्रमाणें माझ्या मनाला संतोषवीत आहे! अहाहा! ह्या रक्तप्रवाहाबरोबर आज माझें सारें दुःख वाहून जात आहे! जाऊं द्या! खुशाल जाऊं द्या! तें असेंच आणखी वाहून जाऊं द्या! बा रुधिरा! खुशाल वहा! सावकाश वहा! तुझ्या या प्रवाहानें मला अत्यंत सुख होत आहे! ( श्वासोच्छ्वास सोडीत ) विधात्या! धन्य आहे तुझी!!!

असे हे चमत्कारिक उद्गार काढून तो रोगी त्या रुधिरप्रवाहाकडे एकसारखी टक लावून पहात बसला! ते वेळीं त्याच्या चेहेऱ्यावर थोडीशी समाधानवृत्ति दिसत होती खरी! परंतु "ही जखम अशीच राहूं दिली तर तींत वायु भरेल" अशी वैद्यराजांस भीति पडल्यामुळें, रोगी नको नको म्हणत असतांही त्यांनीं त्याची ती जखम बळेंच बांधून टाकली! पण ही त्यांची बंधनक्रिया सुरू होतांच रोग्याची चर्या बदलली! आणि त्याचा तो आनंद क्षणांत नाहींसा झाला! तथापि, त्या रोग्यानें वैद्यराजाकडे एकदां आभारदर्शक मुद्रेनें पाहिलें, तेव्हां त्यांनाही आपल्या श्रमाचें सार्थक झाल्यासारखें वाटलें.

रोगी—( उठून ) वैद्यराज! आपल्या या उपकारकारक कृतीनें मी आपला आमरण ऋणी झालों आहें! कांहीं केलें तरी आपले हे उपकार माझ्या हातून फिटावयाचे नाहींत! आपल्याच कृपेनें आज माझा पुनर्जन्म झाला! मला आतां बरें वाटतें! मला आतां सुखोपभोगाची नूतन लालसा उत्पन्न झाली! माझें मस्तक आतां शांत झालें! माझ्या तोंडावर जरा टवटवी आलीसें माझें मलाच वाटतें! करितां मी आपली रजा घेतों! माझ्यासाठीं आपणांस आज फारच तसदी सोसावी लागली! तिची माफी करून ही 'फुल नाहीं, पण फुलाची पाकळी' तरी ह्या गरिबाकडे मेहेर नजर करून स्वीकारावी.

असें म्हणून त्या रोग्यानें एक शंभर रुपयांची नोट काढून वैद्यराजांचे हातीं दिली! तेव्हां वैद्यराजांनींही स्वतां जाऊन त्या रोग्यास गाडींत बसवितांना जरा हात दिल्यासारखें केलें! रोगी आपल्या घरीं गेला, आणि वैद्यराज परत आपल्या ठिकाणीं येऊन बसले!

परंतु तेच वेळीं दारांतून कोणी सुस्कारा टाकलेला त्यांना ऐकूं आला. वैद्यराज उठून तें कोण आहे हें पहायला गेले तों तें त्यांचेंच कुटुंब होतें!

* * * * *

ह्या कृत्यास एक महिना होतो न होतो तोंच तो रोगी त्या वैद्यराजांकडे पुन्हां आला! वैद्यराज त्याकडे लक्षपूर्वक पाहूं लागले, तों त्यांना त्याचे चेहेऱ्यावर पूर्वींचे सर्व विकार जसेचे तसे दिसूं लागले! तेव्हां त्यांना त्या रोगाचें मोठेंच गूढ पडलें! ते त्या रोग्यास कांहीं प्रश्न करणार तों तो आपण होऊनच त्यांस म्हणूं लागला कीं:—"वैद्यराज! प्रारब्धाची गति मोठी विचित्र आहे! ज्यावर तिचा पगडा नाहीं असा कोण या जगांत आहे? एकानें म्हटलें आहे कीं 'देवावर सुद्धां दैवाचा पगडा आहे, परंतु दैवावर मात्र कोणाचा नाहीं!' हें त्याचें म्हणणें अक्षरशः खरें आहे! आपण माझी ती जखम कापून काढली तेव्हां माझ्या सर्व दुःखांचा येथेंच परिहार झाला असें मला वाटलें! पण तें माझें वाटणें माझ्या दुर्दैवाला कसें पसंत पडावें? घरीं जाऊन दोनएक दिवस होतात न होतात तोंच मला त्या दुःखाच्या इंगळ्या पुन्हां चावूं लागल्या! त्यांच्या वेदना डोक्यापासून पायापर्यंत असह्य तिडका देऊं लागल्या! हातांतलें सर्व रक्त या जखमेंत येऊन बसलें! हा उजवा पंजा गुरोळीप्रमाणें सुजला! त्यामुळें माझें पूर्वीचें दुःख तरी बरें, असें हें भयंकर दुःख दुणावलें! करितां, वैद्यराज! कृपा करा! आणि आपल्या शस्त्रक्रियेच्या अनुपम प्रभावानें मला या असह्य दुःखांतून कांहीं काल तरी मुक्त करा! मी दीन आहें! आपणांस शरण आलों आहें! फार काय बोलूं? आपण माझे केवळ मायबाप आहां!" यापुढें तो रोगी आणखी कांहीं बोलणार होता. पण शोकसमुद्राच्या लाटेनें त्याचा गळा दाटून आल्यामुळें त्याला पुढें कांहींच बोलवेना! वैद्यराज त्याच्याशीं फारसे

बोलले नाहींत! त्यांनीं त्याला खुर्चीवर बसविलें, व ती जखम सोडल्यावर त्यांनीं पूर्वीप्रमाणेंच मोठ्या कुशलतेनें शस्त्रक्रिया केली! त्यामुळें त्या रोग्याला बरें वाटलें! दुसरी एक शंभर रुपयांची नोट काढून त्यानें वैद्यराजांच्या हातावर ठेवली, व आपण आपल्या घरीं चालता झाला!

* * * * *

एके दिवशीं प्रातःकाळीं वैद्यराज आपल्या दवाखान्यांत एकटेच बसले आहेत; तों टपालाच्या शिपायानें त्यांना एक पत्र आणून दिलें. पत्राच्या लाखोट्यावर दोन आण्यांचीं तिकिटें लावलीं होतीं! पत्राचा कागद फार पातळ असून त्यावर बारीक अक्षरांनीं दाट मजकूर लिहिला होता! त्यावरून तें पत्र बरेंच मोठें असलें पाहिजे हें उघड आहे! वैद्यराजांनीं लाखोटा फोडून पत्र वाचण्यास सुरवात केली. आंतील मजकूर येणेंप्रमाणें :—

**श्री.**

मुकाम **पुणें**, ता० ...........

रा० रा०.......................वैद्य,............यांस,

साष्टांग दंडवत; वि० वि० ज्याच्या भयंकर यातनांनीं मी आतां लौकरच इहलोक सोडून स्वर्गांत जाणार—छे! छे! नरककुंडांत पतन पावणार—तो अति आश्चर्यकारक रोग आपल्या हातून बरा झाला नाहीं, व यापुढें तो बरा होईल असं मला वाटत नाहीं, म्हणून मी आपणांस, आपल्या शस्त्रक्रियेस, किंवा वैद्यशास्त्रास दोष देतों असें आपण समजूं नये! ह्या माझ्या भयंकर रोगाची मूळ कथा—म्हणजे माझ्या दुर्दैवाची कहाणी—मी आज आपणांस सांगतों. आपण फार कोंवळ्या मनाचे, उदार बुद्धीचे व मजसारख्या दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडलेल्या दीन जनाचा अंतःकरणापासून परामर्ष घेणारे आहां, अशी माझी खात्री झाल्यावरून मी आपलें मन आज आपणापाशीं या पत्रद्वारें मोकळें करून खरी हकीगत कळवीत आहें, असेंच केवळ नव्हे, तर या पत्राशीं आपलाही परंपरा संबंध आहे असें समजूनच, आपणांस आश्चर्यानें थक्क करून सोडणारें हें विलक्षण पत्र लिहिण्याचें मनांत आणलें आहे! म्हणून हें पत्र वाचतांना आपणांस गहिंवर आला, अश्रूंनीं आपले नेत्र अंध झाले, व बाष्पांबुपूर्णनयनांनीं ह्या पत्रांतलीं अक्षरें आपणांस दिसतनाशीं झालीं तरी तें खालीं ठेवूं नका! किंवा 'अमळशानें वाचूं!' असें म्हणून त्याची घडी करून खिशांत घालूं नका! वज्रापेक्षांही आपलें मन कठीण करून, व जखमेच्या त्या असह्य तिडका सहन करून, ज्या अर्थी मी हें पत्र आपणांस लिहीत आहें, त्या अर्थी तें आरंभापासून अखेरपर्यंत वाचण्यास अगदीं कांकूं करूं नका! अथवा हें पत्र अथपासून इतिपर्यंत लक्षपूर्वक वाचण्याची मला आपली इतकी विनंति करणें नको! ह्यांतील मजकूरच इतका चमत्कारिक आहे कीं ज्यांचा यांत

अर्थाअर्थी कांहीं एक संबंध नाहीं, त्यांस सुद्धां करुणा, त्वेष, व कळकळ उत्पन्न होतील, तर मग आपणांस ही त्रयी खात्रीपूर्वक मोह घालील हें मला उघड उघड दिसत आहे! आपणांसच हें विस्तारपूर्वक पत्र लिहिण्याचा दुसरा उद्देश असा आहे कीं, 'धनद्रव्याला भुलुनि' जे आपल्या मुली साठ वर्षांच्या जरठ म्हाताऱ्याच्या पदरीं बांधतात, त्या, पुढें स्वैर निघण्याचा कसा बळकट संभव असतो हेंही आपल्या ध्यानांत यावें! असो.

मी आपणांकडे दोनदां आलों. पण माझ्या त्या दोन्ही खेपा व्यर्थ झाल्या! त्याबद्दल मी आपणांस दोष देतों असें नाहीं! आपण, किंवा धन्वंतरी, अथवा धन्वंतऱ्याचा प्रत्यक्ष गुरु यांपैकीं कोणी जरी मला बरें करण्याचा पैजेनें विडा उचलता, तरी तो माझ्या या रोगापुढें हातच टेंकता! अशा या चमत्कारिक रोगाची उत्पत्ति जशी भयंकर, तसा त्याचा शेवटही भयंकर होणार! तेथें कोणाचा उपाय नाहीं! वैद्यराज! आज सहा महिने झाले, मी मोठा सुखी असें! खावें, प्यावें, आणि देशोन्नत्तीला हातभार लावावा, इतकेंच माझें कर्तव्य होतें, व तें मी यथाशक्ति बजावीत असें! माझा स्वभाव चारचौघांशीं मिळून रहाण्याचा असल्यामुळें, जरी येथें येऊन मला फार दिवस झाले नाहींत, तरी मी बऱ्याच लोकांस प्रिय झालों! विशेषतः लेखन, वाचन व ग्रंथकर्तृत्व यांचा मला नाद फार! स्त्रीशिक्षणाचाही मला अभिमान तसाच! यामुळें येथील बहुतेक वर्तमानपत्रकर्ते व आधुनिक विद्वान् माझे परम मित्र झाले! जातीचा मी **मराठा** खरा; पण ते चटसारे मला पाठच्या भावाप्रमाणें मानतात! सारांश, **पुण्यां**त कायमचें ठाणें देण्याच्या हेतूनें पाय ठेवल्यादिवसापासून मागील सहा महिन्यांपर्यंत माझे दिवस मोठ्या आनंदांत व समाधानांत गेले! सुशिक्षित मनुष्यास जीं कांहीं सर्वसाधारण सुखें भोगावींशीं वाटतात तीं सर्व मी मनमुराद भोगीत असें. ज्या खेडेगांवचा मी मूळ राहणारा, तेथें माझ्याप्रमाणें खाऊनपिऊन सुखी असणारे तीनचार पाटील आहेत! पण त्यांपैकीं विद्यादेवीच्या साम्राज्यांत एकानेंही प्रवेश करून ब्रह्मानंदगडाची सुभेदारी मिळविली नाहीं! फक्त मीच काय तो अपवाद! आणि हें फळ माझ्या आईबापांच्या कृपेचें! तीं सुशिक्षित होतीं! तथापि गरीब स्थितींत असल्यामुळें नौकरीमागें माझ्या बापास बहुतेक जन्म खर्च करावा लागला! तो वारल्यावर मी व माझी आई परत आपल्या गांवीं येऊन राहिलों! तिनें मला विद्याभ्यास करण्यासाठीं ह्याच **पुण्यां**त ठेविलें होतें! माझा अभ्यास पूर्ण झाल्यावर तिनें माझें लग्न केलें. तेवेळीं माझें वय बावीस वर्षांचें होतें, व माझी बायको चौदा वर्षांची होती! ती फार सुंदर असे. योग जमून येऊं लागला म्हणजे तो चहूंकडून सारखा जमून येतो! मला माझ्या मनाप्रमाणेंच बायको पाहिजे होती, व तो बेत **ब्रह्म**देवासही आवडला होतासें दिसतें! व त्याच हेतूनें त्यानें कौशल्यसर्वस्व खर्च करून माझी प्रिया घडविली होती! मुळचीच जी

सुंदर, ती सर्व सद्गुणांनीं मंडित होऊन तिच्याही आईबापांनीं तिला तिच्या लहानपणापासून लिहिण्यावाचण्याचा नाद लावावा, व साऱ्या आमच्या गांवांत माझेंच काय तें जोडपें ज्ञानबलानें व धनबलानें अपवादक निघावें, हा केवढा चमत्कार? लग्न झाल्यादिवसापासून ती कधींही माहेरीं न गेल्यामुळें माझे विचार व माझी सभ्य वर्तणूक तिच्या मनावर इतकी ठाम बिंबली कीं तिच्यासारख्या तिच्या वयांत पोक्त स्त्रिया सुद्धां सांपडणें कठीण! सुशिक्षणानें तिचें मन संस्कृत होऊन तिला स्वतंत्र विचार करण्याची शक्ति आली होती! ती मोठ्या निर्मळ मनाची असे! **हिमालयावर** पडणाऱ्या पांढऱ्या शुभ्र बर्फाला कदाचित् कलंक लागलेला सांपडेल; पण तिच्या शिरीषकुसुमासारख्या कोमलान्तःकरणावर अथवा तिच्या अंतर्बाह्य वर्तणुकीवर कोणत्याही प्रकारचा कोणालाही कलंक सांपडत नसे! मजविषयींचा तिचा अनुराग कांहीं विलक्षण होता! एका **संस्कृत** कवीचें असें ह्मणणें आहे कीं, कुलीन व साध्वी स्त्रिया प्रत्येक गोष्टींत मर्यादशील असतात! पण एका गोष्टींत मात्र त्यांचे ठिकाणीं मर्यादा रहात नसते! आणि ती गोष्ट कोणती? तर, पतिविषयक प्रेम! ह्या त्यांच्या म्हणण्याचा शेकडों वेळां मला अनुभव आला होता! ह्मणून आह्मी उभयतां शरीरानें मात्र भिन्न! बाकी आमच्या एकत्वांत कोणत्याही प्रकारचा फरक नसे! त्यामुळें मी आपणांस मोठा भाग्यवान् समजत असें! व 'स्वर्गसुख' ह्मणून जर कांहीं पदार्थ असेल, तर तो ह्या येथें—ह्मणजे माझ्या घरीं—आहे, अशी माझी पक्की खात्री झाली होती! परंतु हाय! हाय! एके दिवशीं माझ्या मनांत कुविचाररूपी सैतानानें कसा प्रवेश केला, हें माझें मलाच माहीत नाहीं! ज्या दिवशीं त्यानें मला पछाडलें तेच दिवशीं त्यानें माझ्या कानांत एक मंत्र फुंकला! खरोखर, सुखामृताची महानदी दुथडी तुडुंब भरलेली वहात असतां, तींत मनमुराद डुंबण्याचें सोडून देऊन, दुःखार्णवाच्या भयंकर लाटेखालीं गटांगळ्यावर गटांगळ्या खाणें, हा मनुष्याचा मूर्खपणा होय! आणि त्यांतून माझ्यासारख्या विद्वान् ह्मणविणारांचा तर तो पाजीपणाच होय! अस्तु.

सुयोग जमून यावयाचा असला ह्मणजे तो चोहोंकडून जमून येतो असें जें म्यां वर ह्मटलें आहे, तदनुरूप कुयोगाचीही गोष्ट आहे. **इंग्रजींत** एक ह्मण आहे कीं, दुर्दैव यायचें झालें म्हणजे तें एकटें कधींही येत नसतें! त्याप्रमाणेंच नौकरीवर असतां माझ्या बापानें जो द्रव्यसंग्रह केला होता, त्याच्या किल्या माझ्या हातीं यावयाला; माझ्या आईनें स्वदेहाचें सार्थक करण्याच्या हेतूनें **काशीवास** करायला; आणि अशा रीतीनें मी स्वतंत्र होतांच, विद्वत्तेच्या शिखरास पोंचूनही—हर! हर!—त्या सैतानरूपी तस्करानें माझ्या सुविचाररूपी धनावर दरवडा घालावयाला; कशी एकच गांठ पडली! माझ्या बायकोनें कोणत्याही गोष्टीनें अप्रसन्न

राहूं नये ह्मणून जें जें तिनें मागितलें तें तें मी तिला मोठ्या आनंदानें व हौशीनें आणून देत गेलों! तुमच्यासारखी टेबल-खुर्ची मलाही पाहिजे असा तिनें एक दिवस हट्ट घेतला! तोही मीं मोठ्या आनंदानें माझ्या नेहमींच्या उल्लसित वृत्त्यनुरूप ताबडतोब पुरविला! तिचें टेबल माझ्या टेबलाशेजारींच होतें! त्याला दोन पुडें (drawers) होतीं. तशीच खुर्चीही म्यां तिला मोठी सुरेख घेऊन दिली होती! कोणी नसलें ह्मणजे तिनें त्या खुर्चीवर येऊन बसावें, व मला नित्य निरनिराळ्या विषयांवर नवीन नवीन प्रश्न करावे. माझ्या समजुतीप्रमाणें म्यां त्यांचीं उत्तरें द्यावीं! कधीं कधीं आमच्या या वादविवादांत प्रणयकलहही होत असे! व त्याचा परिणाम असा व्हावा कीं, मी रागावलोंसें तिला वाटलें ह्मणजे तिनें चटकर उठून 'हार्मोनियम'ची पेटी उघडून तो बाजा वाजविण्यास आरंभ करावा! व सुंदर आलाफ काढीत 'अभिनव मधुलोलुप हे मधुकरा अशी!' हें संगीत शाकुंतलांतील मनोहर गाणें किंवा 'हिंमतबहाद्दर' नाटकांतील अंजनी गीत 'सखा माझा नाग!, त्याची मी नागीण!!, देईन माझा प्राण; त्याचेसाठीं' वगैरे; ज्यांहिं माझें मन सुप्रसन्न होऊन तिला मी गाढालिंगन देऊन तिचें प्रेमपूर्वक चुंबन घ्यावें; अशा मधुर ओंव्या म्हणत तिनें आपला कोमल कंठ आणि हार्मोनियमचा कर्णमधुर नाद अगदीं एक करून सोडावा! सारांश, अशा या आमच्या नित्यक्रमानें ती चांगलीच सुशिक्षित झाली, असें ह्मणण्यास हरकत नाहीं! वर सांगितलेल्या पुडांच्या किल्ल्या मात्र निरनिराळ्या होत्या! माझी किल्ली तिच्या पुडास लागूं नये, व तिची माझ्या पुडास लागूं नये! कधीं कधीं आह्मी उभयतांनीं पुस्तकें वाचण्यांतच दंग व्हावें! व कधीं कधीं आम्ही उभयतांनींही लेखनक्रियेंत गढून जावें! कधीं कधीं म्यां पुस्तक हातांत घेऊन तिची समजूत घालावी, व कधीं कधीं तिनें वर्तमानपत्रें किंवा मासिक पुस्तकें घडघड वाचावींत, व म्यां स्वस्थ ऐकत पडावें! आपल्या माहेरीं वगैरे स्वतः तीच पत्रें लिहीत असे! असो. त्या दिवसापासून मी तिच्या प्रत्येक गोष्टीकडे लक्षपूर्वक पहाण्यास आरंभ केला! पण तो अशा शिताफीनें कीं, माझें हें संशययुक्त पहाणें तिच्या मुळींच लक्षांत न यावें! आमचा असा नित्यक्रम चालत असतां, तिनें आपल्या टेबलाचें एक पूड संशययुक्त मुद्रेनें दिवसांतून निदान दोन तीन वेळां तरी उघडावें! त्यांत अमुक एक पदार्थ आहे, अशी आंत हात घालून तिनें आपल्या मनाची खात्री करून घ्यावी! व पुन्हां तें पूड तिनें बंद करावें! मी जें पापाचें पुढें भयंकर आगर उभारण्याचा दृढ संकल्प केला; त्याचा हा पाया! तेव्हांपासून माझ्या मनाची स्वस्थता नाहींशी झाली! असा त्या पुडांत अजब पदार्थ आहे तरी कोणता? व तो मी पाहीन केव्हां? हाच मला हृद्रोग लागला! व हाच पुढें माझ्या विचारगांभीर्याचा विषय होऊन बसला! शत्रूच्याही मनांत न येणाऱ्या कुकल्पना माझ्यापुढें मूर्तिमंत उभ्या राहूं लागल्या! तेणें-

३१-११२८०



करून मी अगदीं वेडा झालों! आणखी, मी असा वेडा होऊन जावयाला दुसरें कारण असें झालें कीं, तिनें आपल्या टेबलाच्या किल्लया कधींही व कोठेंही विसंबूं नयेत! सदोदित गळ्यांत गोफ घालून त्यांत अडकवून ठेवाव्या! तें पूड तिनें कधीं उघडें टाकूं नये! कुलूप लावल्यावर त्या पुडाच्या हस्तिदंती मुठीनें तें लागलें आहे कीं नाहीं असें दोन चार वेळां तिनें तें मागें पुढें ओढून पहावें! तेव्हां माझ्या मनांत सहजच एक विचित्र कल्पना आली कीं, ही वरून जितकी गोरी आहे तितकीच आंतून काळी आहे! व तिचा तो सर्व काळेपणा त्या किल्लीकुलुपांत भरला आहे!!! तेव्हांपासून तिच्या त्या मृगशावकांसारख्या काळ्याभोर डोळ्यांच्या दृष्टीची प्रभा मला केवळ पापमय दिसूं लागली! तिचा तो प्रेमकटाक्ष मला हलकट वेश्येच्या दृष्टिचांचल्याप्रमाणें भासूं लागला! तिचा तो 'मदनमंगलधामा'प्रमाणें भासणारा गोरागोमटा व नाजुक मुखडा मला पंडूरोगानें प्रपीडित झाल्यासारखा दिसूं लागला! तिचे ते 'सुधारसाच्या मधुर कंदाप्रमाणें सुबोल मला मायावी राक्षसीप्रमाणें कर्णकटु वाटूं लागले! आणि तिचीं तीं सप्रेम चुंबनें मला एखाद्या जलाल नागिणीच्या दंशाप्रमाणें अति दुःसह वाटूं लागलीं!!! कारण, तिच्या त्या सौजन्याच्या ठिकाणीं कापट्य मूर्तिमंत खिळलें आहे, असा माझा ग्रह ठाम झाला! ती आपल्याकडून माझ्याशीं वागावी तशीच वागत होती! पण तिचें तें करणें मला निव्वळ मानभावीपणाचें वाटत असे! मी आपल्या मनाला असें म्हणत असे कीं, "जिचा आपला जन्माचा संबंध; त्यांतून सुशिक्षणानें जिचें मन संस्कृत झालेलें, तीच जर आपल्याशीं असा बेइमानपणा करूं लागली, तर तिचें तें सौंदर्य, सौजन्य व प्रेम काय जाळायचें आहे?"

पुढें लौकरच एके दिवशीं एक तरुण स्त्री माझे घरीं आली! ती माझ्या ओळखीची नव्हती. परंतु ती आल्यावर, तिचा व माझ्या बायकोचा जो एकवचनात्मक संवाद झालेला माझ्या कानीं आला, त्यावरून त्या दोघी नातलग असाव्या, किंवा बाळपणच्या मैत्रिणी असाव्या, अशी माझी कल्पना झाली! तिचा माझा तोंपर्यंत कोणत्याही प्रकारचा संबंध नव्हता! परंतु माझ्या घरांत दुसरें कोणीही नसल्यामुळें "तुमच्या बायकोला आज आमच्या येथें जेवायला पाठवा! जाऊबाईच्या मुलाचं बारसं आहे; त्या निमित्तानें आमच्या घरीं जेवणावळ आहे! तुह्मांलाही पुरुषांकडून आमंत्रण येईलच! तुम्ही रागें भराल म्हणून तुमची बायको तुह्मांला विचारण्यास भित्ये!" हें तिनें मला मोठ्या आदबीनें विचारलें! तेव्हां "माझी बायको घरांतून बाहेर जाते केव्हां? आणि तिच्या टेबलाचें पूड उघडण्याची मला संधि साधते केव्हां?" असें मला झालें असल्यामुळें "बरें आहे! घेऊन जा तिला! संध्याकाळीं तिला नीटनेटकी घरीं पोंचती करा म्हणजे झालें! मी मात्र जेवायला यावयाचा नाहीं! कारण माझी प्रकृति आज

नीट नाहीं! तुमच्या घरच्या पुरुषांस हेंच नीट बजावून सांगावें! व ते आले, तरी त्यांचें येथें येणें निष्फळ होईल हेंही त्यांना सांगून ठेवावें!" असें मी तिला ताबडतोब उत्तर दिलें! माझ्यांत चलबिचल झालेली माझी बायको जाणून होती! परंतु ती मोठी भित्री व माझ्या धाकांत असल्यामुळें "तुझांला आज असें काय होतें?" असा तिच्यानें मला कधींच प्रश्न करवला नाहीं! त्या बाईच्या निमंत्रणाला मी रुकार दिला खरा! पण माझी बायको माझ्याच काळजींत असल्यामुळें त्या आमंत्रणास भरलेला होकार तिला अर्थात् रुचला नाहीं! पण पतिव्रता स्त्रियांस पतीच्या आज्ञेचें उल्लंघन केवळ प्राणसंकट होय! व तिच्या त्या पातिव्रत्याचें व्रतही तसेंच कडकडीत होतें; त्यामुळें त्या बिचारीचा निरुपाय झाला! ती मुकाट्यानें उठली, व माझ्या खाण्यापिण्याचें करून ती त्या बाईबरोबर गेली! परंतु काय चमत्कार पहा! जातांना ती आपल्या किल्लया टेबलावरच विसरली! वस्तुतः पहातां तिनें त्या किल्लया अशा रीतीनें विसरून जाणें तिच्या आजपर्यंतच्या वर्तणुकीवरून असंभाव्यच होतें! मग दुर्दैवाचा दारुण पाश त्या बिचारीच्या गळ्यांत पडायचा होता ह्मणून म्हणा! अथवा प्रस्तुतची ही भयंकर व्याधि मला जडायची होती ह्मणून ह्मणा! ती आपल्या किल्लया विसरून गेली खरी! मला तर असें वाटतें कीं, माझ्या स्वभावांत ते वेळची चमत्कारिक चलबिचल झालेली पाहून त्या बिचारीचें धाबेंच दणाणलें असावें! व माझ्या विषयींच्या तिच्या प्रेमातिशयानें ती वेडी होऊन मजविषयींच्याच एका प्रकारच्या मनोभ्रमणांत तिला त्या किल्लयांचा विसर पडला असावा! एरवीं पडायचा नाहीं! तें कांहीं असो! टेबलावर ती किल्लया विसरून गेली खरी! माझ्याही ध्यानीं मनीं ते वेळीं किल्लयांशिवाय दुसरें कांहीं नव्हतें! ह्मणून ती बाहेर पडतांच मी जों आपल्या दिवाणखान्यांत गेलों तों त्या किल्लया तेथेंच तिच्या टेबलावर पडलेल्या सांपडल्या! मग माझ्या त्या आनंदास व शेफारलेल्या त्या सैतानास तर ऊतच आल्यासारखें झालें! मी किल्लया घेऊन त्या टेबलाचें तें नेमकें पूड उघडूं लागलों! तें उघडतांना मी जसें कांहीं विश्वासघातासारखें एखादें महत्पातकच करीत आहें, असें वाटून माझी छाती धडधडूं लागली! व त्यामुळें माझ्या हाताला कांपरें भरल्यासारखें होऊन सर्वांगावर थर्‌कन कांटाच उभारल्यासारखें वाटलें! शिवाय, मला असेंही वाटूं लागलें कीं, माझ्या प्रियेचीं रहस्यें जीं आजपर्यंत अति गुप्त होतीं, तीं मी आज जाणूनबुजून उघडकीस आणीत आहें! असो. मीं तें पूड उघडलें! आणि पहातों तों आंत बरेच कागदपत्र व्यवस्थेनें मांडून ठेवले आहेत. ते सर्व त्यां एकामागें एक काढून पाहिले, व पुन्हां ते सर्व जसेच्या तसेच ठेवले! ते अशा तऱ्हेनें कीं हें पूड उघडून आंतील कागदपत्रांस कोणाचा हात लागला असावा अशी तिच्या मनांत शंका सुद्धां येऊं नये! हें सर्व होतांना माझी छाति अधिक

धडधडूं लागली! व माझे श्वासोच्छ्वासही चमत्कारिक रीतीनें वाहूं लागले! मुख्य मुद्दा जेव्हां सांपडेना, तेव्हां मी बराच खजील होऊन कृतकर्माचा पश्चात्ताप करूं लागलों! संशयनिरसनार्थ पुडांत पुन्हां एकदां हात घालून आंतील दोन्ही कोंपरे चांपसले! तों एकांत तिच्या ठुशीखालीं मला एक 'पाकिट' सांपडलें! तें पहातांच विद्युल्लतेच्या चपल स्फुरणाप्रमाणें माझे डोळेच दिपले! कारण, त्या 'पाकिटां-' तून जेव्हां म्यां पत्रें बाहेर काढलीं, तेव्हां त्यांत पहिल्याचप्रथम मला हें पत्र दिसलें:—

**प्राणप्रिये अहिल्ये!**

**दिंड्या.**

**रूप यौवन संपन्न चारुशीला!।**
**आजवर म्यां पाहिल्या बहू वेळां!॥**
**पुढेंही मी पाहीन राजबाला!।**
**लाजविति ज्या सौंदर्यसागराला!॥ २॥**

**तुझ्या ऐशी परि पंकजास्य बाला!।**
**अती सुंदर हरणारि मन्मनाला!॥**
**मंजु वचनीं देणारि चिरसुखाला!।**
**नसे एकहि त्यांच्यांत भाग्यशीला!॥ ३॥**

**स्नेह, सौंदर्यानंद, शांतवृत्ती!।**
**प्रियाठायीं निस्सीम थोर भक्ती!॥**
**असशि मंडित तूं सर्व ह्या गुणांनीं!।**
**मला होशी प्रिय फार तूं ह्मणूनी!॥ ४॥**

**तुझे! सखये! तें मंजु मंजु बोल!।**
**कुणा नाहिंत करणार चित्ति लोल?॥**
**फार दुर्मिळ तव मधुरशा वचांतें!।**
**कोण नाहीं झटणार झेलण्यातें?॥ ५॥**

**तुझी कंबर बारीक! चाल मंद!।**
**रुंद छाती! स्तन पीन मदें तुंद!॥**
**नेत्रकांती! वक्रता भ्रूलतेची!।**
**करिति वृत्ती तल्लीन ह्या जिवाची!॥ ६॥**

**तुझे सद्गुण सौंदर्य फार थोर!।**
**करिति माझें गे हृदय गार गार!॥**
**उभयतांचीं हितगुजें उभयतांला!।**
**प्रेम निर्मळ लागतें कथायाला!॥ ७॥**

तया प्रेमाच्या विमल नदीमाजीं ! ।
सखे! होऊं न्हाऊनि धन्य आजीं ! ॥
घेउं मनिचें पुरवूनि सर्व कोड ! ।
गोड सौख्याची मिळवुं दिव्य जोड !* ॥ ८ ॥

* * * * *

सारांश, हीं व इतर पत्रें जेव्हां माझ्या दृष्टीं पडलीं तेव्हां खरोखर माझ्या संशयास फारच बळकटी येऊन "चोर अगदीं मुद्देमालासकट" पकडला गेल्याचा मला क्षणैक आनंद झाला ! मीं तीं सर्व पत्रें वाचून पाहिलीं! आणि शेवटीं असें कळून आलें कीं, तीं सर्व पत्रें 'अनुरागपत्रिका' म्हणजे मदनलेख होत!!! त्यांतील बाकीच्या पत्रिका येथें देऊन मी आपल्या पत्राची जागा विटाळूं इच्छित नाहीं! त्या पत्रिका हरणाच्या सुरेख कातड्याच्या बहुमोल 'पाकिटां'त घालून त्या 'पाकिटा'च्या चाऱ्ही कांठावर चांदीची अति सुंदर वेलपत्ति काढून चार कोंपऱ्यांत चार सुवर्ण कुसुमें काढलीं होतीं ! त्या 'पाकिटा'वर मध्यभागीं सुवर्णरेषांकित "सौभाग्यवति अहिल्याबाई" हीं अक्षरेंही पाहण्याजोगीं होतीं ! तें कातडें घोटघोटून त्याला किरमिजी रंग आणला होता ! त्याला कलाबतूचा एक बहुमोल गोफ होता. ज्या टोंकाला तो बांधला होता, तें टोंक 'पाकिट' बंद करण्याचें असून त्याला मेहेरपीचा आकार नक्षीसकट काढला होता ! त्या गोफानें त्या 'अनुरागपत्रिका' पहिल्यासारख्या बांधून, होत्या तेथेंच ठेवल्या! व मोठ्या उद्विग्नतेनें तें 'टेबलाचें' पूड म्यां बंद केलें!!! हर! हर! वैद्यराज! तिच्या व्यभिचारकर्मास उजेडांत आणणाऱ्या त्या 'अनुरागपत्रिका' वाचून मला काय वाटलें असेल, याची आपणच कल्पना करा ! तिच्या पापाचा घडा आज पूर्ण भरला, असें वाटून मी आपलें देहभान विसरलों ! माझ्या चोरून व्यभिचार कर्म करणाऱ्या त्या अधमाधमेच्या नरडीचा मी केव्हां घोंट घेईन, असें मला झालें! माझे डोळे रक्तासारखे तांबडेलाल होऊन मी आपलीं बुबुळें गरगरां फिरवूं लागलों! क्रोधानें भिंवया धनुष्यासारख्या वक्र झाल्या ! व एखादें शस्त्र किंवा बंदूक मला ह्या वेळेस मिळेल तर फार बरें होईल, असें वाटून तें मी शोधावयास लागलों!!! पण तें सांपडेना ! तेव्हां मी आपल्याशींच मोठ्या त्वेषानें वेड्यासारखा बडबडूं लागलों कीं :—"हा कुलांगारे ! तुझा काळ फार समीप आला आहे, पण वेळ आली नाहीं; असें वाटतें ! चिंता नाहीं ! ती आणणारा आणि तुझ्या पापाची तुजकडूनच झडती देवविण्याला तुला **यम**पुरीस पाठविणारा मीच आहें ! अगे ! जो तुझ्या सुखसर्वस्वाचा, प्रेमसर्वस्वाचा, किंबहुना प्राणसर्वस्वाचा ठेवा जाणून ज्याला तूं जीव कीं प्राण करीत

* समयाभावीं "मुक्तांजलीं"तल्याच कवितांवर निर्वाह करणें इष्ट वाटलें. क्वचित् फेरफार केला आहे.

तीस, त्या माझ्याशींच तुझें हें असें कपट काय? तुझ्यापेक्षां बाजारबसव्या विश्वयोषिता फार बऱ्या! त्या उघड रीतीनें आपल्या शरीराचा विक्रय करतात! पण तूं तर—हे कामीजनमनोहर राक्षसी!—पातिव्रत्याचा तोरा मिरवून गुप्त रीतीनें असलीं बदकर्में करूं पहात्येस काय? अथवा 'पहात्येस' असें संशययुक्त ह्मणणें तरी कशाला पाहिजे? तूं तीं करण्यास कधींपासूनच सुरवात केली नसशील कशावरून? 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' ह्मणून जें **मनुनें** ह्मटलें आहे, तें अक्षरशः खरें आहे! आह्मी डोळ्यांवर कांतडें ओढून घेऊन स्त्रियांची सुधारणा करणारे, व त्यांचें दास्यत्वांतून विमोचन करणारे, सुधारक खरोखरच महामूर्ख! महापाजी! तुह्मांला उठतां लात व बसतां बुक्कीच पाहिजे! तुम्ही बायका कपटी, छिनाल, साहसी, अविवेकी, मायावी वगैरे सर्व कांहीं आहां! तुमच्या सारख्या स्त्रिया—

**"गोड शब्द वदनें वदतील। प्रेमपूर्ण नयनें हसतील॥**
**चिंतितील हृदयीं भलत्यातें। स्त्रीचरित्र न कळे कवणांतें*!॥१॥"**

खरें आहे! एवढा मोठा प्रपंचपंडित **भर्तृहरि**! पण त्यानें सुद्धां स्वस्त्रीचें आचरण पाहून मोठ्या दुःखानें स्वतास धिक् ह्मणून घेतलें! ज्याअर्थी तुह्मी खाल्ल्या घरचे वासे मोजणाऱ्या असून कोणावर—प्रत्यक्ष नवऱ्यावर सुद्धां—संतुष्ट रहाणाऱ्या नाहीं, त्याअर्थी तुह्मांलाही पण धिक्कार असो! परंतु हे रूपातिशयाचा गर्व मिरविणारे पापिष्टे! तुझ्या एकटीसाठीं म्यां सर्व स्त्रीवर्गास काय ह्मणून दोष द्यावा? तूं एक आपल्या कुलाला बट्टा लाविलास म्हणून सर्वत्र स्त्रिया तुझ्यासारख्या बदफैली निघतील असें कधींही होणार नाहीं! चांडाळणी! तुला सुशिक्षण देऊन म्यां तुझें मन जें संस्कृत केलें, तें अशाच साठीं काय? बाजारबसव्या विश्वयोषितांस शिक्षणाचा बहुधा गंध नसतो, ह्मणून शिक्षणाचे अभावीं कुसंगतीनें अथवा दुसऱ्या कांहीं अन्य कारणानें आपल्या शरीराचा त्या ज्या उघड रीतीनें क्रयविक्रय करितात, तो तुझ्यासारख्या सुशिक्षितपणाच्या व पातिव्रत्याच्या तोऱ्यावर मोठ्या हुशारीनें लपून छपून व्यभिचारकर्में करण्यापेक्षां फार बरा! अधमे! तुझ्यासारख्या बदमाष बाया स्त्रिशिक्षणाचीं अशींच फळें देणार काय? द्या खुशाल, द्या! कराल तसें भोगाल तुह्मीच! पण हें अधमाधमे! त्वां एकटीनें किंवा तुझ्यासारख्या कामाग्नीनें होरपळलेल्या जारिणींनीं जरी त्या स्त्रिशिक्षणाचे हवे तसे भंडवडे मिरविले, तरी तें बिचारें आहे तसेंच बावनकशी सोन्याप्रमाणें परम पवित्र आहे! तुझ्या प्रचंड कामाग्नीनें माझी शांतता जाळून खाक केली आहे, म्हणून त्याचीही मला चांगलीच शांति केली पाहिजे!" असें ह्मणून म्यां इकडे तिकडे पाहिलें तों तेथेंच कोठें मला माझ्या लग्नांतली कट्यार सांपडली! ती मी हातांत घेऊन वेड्यासारखे नानातऱ्हेचे चाळे
पण काय करतो बिचारा? सांपडला तिच्या प्रेमपाशांत! त्या पाशांतील प्रेमरज्जूंनीं

* मोहविलसित नाटक, अंक १ ला.

करून आपल्याशीं बोलूं लागलों कीं:-" आज तुझ्या कामाग्नीची शांति मी या कट्यारीनें करणार ! व हें माझें करणें जितकें आश्चर्यकारक आहे त्यापेक्षां तुझ्यासारख्या सुशिक्षित स्त्रिया कुमार्गगामी निघणें अधिक आश्चर्यकारक आहे! असो! आज तुझ्याबरोबरच तुझ्या आश्चर्याचाही शेवट माझ्या हातानें लागो म्हणजे झालें!" असें म्हणून ती कट्यार मी आपल्या टेबलाच्या पुडांत ठेविली, व तिची वाट पहात बसलों ! जेवण नाहीं, खाण नाहीं, कांहीं नाहीं ! माझें आत्मगत भाषण होत असतां जर माझा अंगविक्षेप पहाण्यास कोणी अदृश्य रूपानें तेथें असता, तर सैतानांत व माझ्यांत बिलकूल फरक नाहीं, अशी तेव्हांच त्याची खात्री झाली असती! फार तर काय? पण माझ्या दिवाणखान्यांत समोरच एखादा पुरुषभर उंचीचा आरसा असता, तर त्यांत माझ्या अंगविक्षेपादिकांचें पडणारें प्रतिबिंब पाहूनच मी शरमिंदा झालों असतों! असो. माझें माथें असें फिरून गेल्यामुळें काय करावें? काय नाहीं? वगैरे कांहींएक सुचेना! अंगाची अगदीं लाही झाली! डोळ्यांची आग होऊं लागली ! जीभ कोरडी पडली! व माझें सारें लक्ष दरवाज्याकडे लागलें! तें अशाकरितां कीं ती येते केव्हां? व तिच्या पापाचीं फळें मी तिला देतों केव्हां? पुष्कळ वेळ झाला! बारावर तीन वाजले! तरी ती येईना! ती सायंकाळीं येणार हें मी अगदींच विसरलों! पलंगावर माशासारखा तळमळत पडून कसा तरी इतका वेळ काढला! कुविचाररूपी पिशाचिकेशिवाय मला कांहींच दिसेनासें झालें! शेवटीं, मनाचा थोडा निग्रह करून म्यां स्नान केलें, व थोडेंसें खाल्लें! पण "नावडतीचें मीठ आळणी" या म्हणीप्रमाणें जें अन्न मला रोज अमृताप्रमाणें गोड लागत असे, तेंच मला ते दिवशीं विषासारखें कडूं लागलें! येनकेन जेवण झाल्यावर मी आपल्या मनाशीं पुन्हां विचार करूं लागलों कीं, ती येतांच म्यां तिला ठार केलें तर भलतेंच कांहीं होईल! व जिला मी आजपर्यंत तळहातावरील फोडाप्रमाणें झेलली, त्या बिचारीचा असा क्रूरपणानें वध करणें मला बरें वाटेना!!! हें माझें वाटणें अगदींच मूर्खपणाचें होतें! कारण, तळहातावरील फोड तरी फोडायचाच व तिलाही ठार करायचीच! पण करायची हा निश्चय खास! मग त्या अघोर कृत्यांत वेडगळासारखे हे प्रेमोद्गार पाहिजेत कशाला? पण नाहीं! तेवेळेस जरा राग शांत झाला होता! म्हणून पुन्हां उठलों व तें पुड उघडून त्या 'अनुरागपत्रिका' पुन्हां लक्षपूर्वक वाचूं लागलों, तों आजपर्यंत वाग्वधूच्या प्रेमकटाक्षांस पूर्णपणें पात्र झालेल्या प्रणयलोलुप स्त्रीपुरुषांनीं परस्परांकडे निरनिराळ्या प्रसंगीं पाठविलेल्या प्रत्येक मदनलेखांत जशी निरनिराळी खुबी आहे तद्वत् त्यांतील प्रत्येक 'अनुरागपत्रिका' निरनिराळ्या तऱ्हेनें लिहिलेली आढळली! ह्या 'अनुरागपत्रिकां'तील नायक **गोपाळराव** म्हणून माझा प्राणमित्र आहे तो! जिवाला जीव देणारा! सभ्य! विद्वान्! माझ्या केंसाला लागलेला धका त्याच्या प्रेमलान्तःकरणास कासावीस करी; इतकें त्याचें माझें अकृत्रिम मित्रत्व!

पण काय करतो बिचारा? सांपडला तिच्या प्रेमपाशांत! त्या पाशांतील प्रेमरज्जूंनीं त्याचें सदाचरण व एकपत्नीव्रत जखडून आवळून पापसमुद्रांत बुडविलें! अथवा मदन हा दुर्निवार आहे! तेव्हां त्यानेंच तिच्या सौंदर्यातिशयाला मोहून नाना तऱ्हेच्या गुप्त कारस्थानांनीं तिचें मन हरण केलें नसेल कशावरून? सारांश, माझ्या क्रोधरूपी वडवानलावर जरी अशा तर्कवितर्करूपी महासागराचें समग्र दडपण पडलें होतें तरी तो आंतले आंत एकसारखा धुमसत होताच! अहाहा! ती **गौतम** ऋषीची **अहिल्या** किती पवित्र होऊन गेली? त्या **होळकराच्या अहिल्येनें** आपली सत्कीर्ति आपल्यामागें यावचंद्रदिवाकरौ कशी फडकत ठेविली? आणि आमच्या या '**अहिल्ये**'नें आपल्या संसाराचा कसा खेळखंडोबा मांडला? धिक्! नीचे! तूं शासनास—छे! देहान्त शासनासच–पात्र आहेस! तुला जगांतून नाहींसें करणें ह्मणजे पृथ्वीचा भार हलका करणें होय! असें म्हणून मीं त्या 'अनुरागपत्रिका' जशाच्या तशा गुंडाळून तिच्या टेबलाच्या पुडांत ठेविल्या, व तिच्या येण्याची वाट पहात मी खिडकीच्या दालनाशीं उभा राहिलों! तों सूर्यास्त होऊन दिवे लागण्याची वेळ झाली! तेव्हांचें तें सृष्टिसौंदर्य! शहरांतील बाजारांत वगैरे प्रमुख ठिकाणीं चाललेली गजबज! **तुळशीबाग** व **बेलबाग** येथें देवदर्शनार्थ येणाऱ्या भुवनसुंदरींचा थाटमाट! 'लायब्ऱ्या,' 'हिराबाग' वगैरे ठिकाणीं होणाऱ्या विद्वज्जनांची दाटी! वगैरे अनेक गोष्टींच्या उपभोगास विन्मुख होऊन शांतता आणि उदासीनता यांच्या मी पूर्ण तावडींत सांपडून त्या खिडकीशीं एखाद्या खांबाप्रमाणें उभा राहिलों! शहरांत चहूंकडे दिवाबत्ती झाली! पण माझ्या घरांत नौकरचाकर असून अंधार! त्या सर्वांना ते दिवशीं म्यां सुट्टी देऊन त्यांना आपल्या घरीं लाविलें! कांहीं वेळानें मला घोड्यांच्या टापा व गाडीचा घडघडाट ऐकूं आला! तों "**राम्या! अरे खंड्या!** आज घरांत अंधार कां असा? कायरे घरांत कुणीच नाहीं काय? ती **गजी** कुठं आहे? काय बाई! येवढ्या वाड्यांत दिवाबत्ती नसल्यानं तो जसा कांहीं मला खायलाच उठलासा वाटतो!" असें म्हणत माझी बायको थबकत थबकत वर दिवाणखान्यांत येऊं लागली! तों "मी असल्यावर 'सौभाग्यवति **अहिल्याबाईला**' कोण खाणार आहे?" असें म्हणतांच ती दचकल्यासारखी मला वाटली! परंतु माझा शब्द तिनें ओळखतांच ती एकदम धांवत येऊन माझ्या गळ्यास मिठी मारून मोठ्या लडीवाळपणानें मला म्हणूं लागली कीं:—'हें काय बरं असं?' आज जेवायला कां बरं येणं नाहीं झालं? **गोपाळराव** सुद्धां आले होते! आपली त्यांनीं पुष्कळदां आठवण केली होती! कां बरं आपण जेवायला नाहीं आलां? घरांत असा अंधार काय ह्मणून? कोठें गेले ते मेले नौकरचाकर? **गजी** कुठं आहे? आपण असे अंधारांत एकटेच चिंताक्रांत कां उभे? आपणांस काय होतं? मीं असा आपला अपराध तरी काय केला? कां बरं आपण माझ्यावरची माया पातळ केली?" असे एक कां दोन? हृदयास द्रव आणून सोडणारे हजारों प्रश्न तिनें मला केले! पण त्यांपैकीं एकाचेंही

उत्तर मजकडून तिला मिळालें नाहीं! ती माझ्या अंगाला बिलगतांच, व विशेषतः त्या चांडाळ गोप्याचें नांव घेतांच, तिच्या कंबरेंत लाथ मारून तिला खालीं पाडावी असें माझ्या मनांत आलें होतें! पण पुन्हां म्यां विचार केला कीं, खून करणारे आरोपी सुद्धां फांशी मिळण्याचे पूर्वी इच्छित पदार्थ मागून घेण्यास सरकाराकडून पात्र होतात! मग जी एक वेळ माझा केवळ कलिजा असे, व जिचा मी आज निष्ठुरपणानें पाषाणहृदयीं बनून खून करणार; तिनें जर शेवटचें मला कंठालिंगन दिलें तर खुशाल देवो! मला जरी तें जलाल नागिणीनें वेटाळल्याप्रमाणें अति दुःसह वाटत आहे, तरी तिला तें, कल्पतरूला पुष्पभरार्ता नवमल्लिकेनें प्रेमें करून गाढालिंगन दिल्यासारखें वाटत असेल, तर खुशाल वाटो! व त्यापासून तिला येवढें तरी माझ्यापासून शेवटचें सुख मिळो! तिच्या त्या अनेक प्रश्नांपैकीं मजकडून एकाही प्रश्नाचें समाधानकारक उत्तर न मिळतां तिला उलट म्यां असें विचारलें कीं, "तुझ्या टेबलाच्या किल्ल्या कोठें आहेत?" किल्ल्या ह्मणतांच ढगापासून जशी विद्युल्लता पतन पावते तशी ती झटकन् दूर होऊन मोठ्यानें ह्मणाली—"हाय! हाय! माझा विश्वासघात झाला!" विश्वासघाताचें नांव घेतांच माझी तळपायाची आग मस्तकास गेली! पण मोठ्या कष्टानें म्यां ती भडकूं दिली नाहीं! माझी बायको झर्‌कन आंत गेली, व दोनचार ठिकाणीं दिवे लावून आपल्या टेबलाकडे आली! तों तिच्या किल्ल्या तेथेंच पडलेल्या तिला सांपडल्या! तिनें तें नेमकें पूड उघडून आंत लक्षपूर्वक पाहिलें! सारे कागदपत्र व ती ठुशी आहे तशीच आहे असें पाहिल्यावर तिच्या जिवांत जीव आला! व तें पूड बंद करून मजकडे ती हास्यमुद्रेनें पाहूं लागली! परंतु तिचें तें हंसणें मला हेवोत्पादक वाटून अंतःकरणासही झोंबल्यासारखें झालें! मग तिच्या त्या हंसण्यांत कृतज्ञता असो, प्रेम असो, कीं माझी फजिती असो! त्या हंसण्यापासून मला मुळींच आनंद झाला नाहीं! उलट तिच्या त्या हंसण्यानें माझा क्रोधाग्नि अधिक प्रज्वलित होऊन आंतले आंत धुमसूं लागला! पण मोठ्या विवेकानें मीं त्याचें आकलन केलें! मी मनांत असा विचार केला कीं आतांपासूनच हिच्याशीं मी धुसमुस करूं लागलों, तर आपल्या इच्छित कृत्यास विघ्न येईल. कारितां, हिच्या कलाकलानेंच घ्यावें! त्यामुळें तिच्या येण्यापासून मला बराच आनंद झाला असें म्यां बाह्यात्कारीं दाखविलें!

**ती** ह्मणाली:—नाहीं कां माझ्याशीं मन भरून बोलायचं?

**मी**—कां बरें? तुझ्याशीं न बोलावें, तर बोलावें तरी कोणाशीं?

**ती**—असेल दुसरी कोणी तरी मनांत घोळत?

**मी**—छे! छे! प्रिये! असें कसें होईल? तूं तर माझ्या प्रेमाचा आधार! सौख्याचा साठा! शांतीचा ठेवा! असें असतां, तं भलताच विचार मनांत कसा आणतेस?

**ती**—असं आहे, तर आज सात आठ दिवस आपल्या ठिकाणीं एकसारखी जी मी विलक्षण चलबिचल झालेली पहात्यें ती काय ह्मणून?

या प्रश्नाचें उत्तर टाळावें म्हणून म्यां विषयांतर करून म्हटलें कीं, आपण मग सावकाश बोलत बसूं! सध्यां मला लागली आहे भूक! थोडासा चुलीवर भात टाकशील तर मला दोन घांस अधिक जातील! ती ताबडतोब परसांत गेली, आणि दुपारचा तो स्वयंपाक व म्यां वाढून घेतलेलें ताट जशाचें तसेंच पाहून मनांत दचकली! मी लपून तिच्या सर्व कांहीं क्रिया पहात होतों! तिनें माझें उष्टें काढतांना आपल्याशीं म्हटलें :—"काय झालें माझ्या प्राणविसाव्याला कोणास कळे! आई, अंबाबाई! आम्हां दोघांत तूं कधींही विघड पाडूं नकोस! माझ्या सख्याची वृत्ति पहिल्यासारखी स्थिर झालेली जर मी उद्यां सकाळीं पाहीन तर तुझी खणानारळांनीं ओटी भरीन!" अहाहा! किती हे तिचे प्रेमळ व खऱ्या कळवळ्याचे शब्द? पण मला अधमाला ते काय होत? तिनें माझें उष्टें काढलें, व चुलीवर भात टाकून ती जाळ करूं लागली! इतक्यांत मी दिवाणखान्यांत येऊन त्या टेबलाच्या पुढांतली ती कट्यार काढून धोतराच्या निऱ्यांत मोठ्या खुबीनें लपवून ठेविली! तों तिनें मला हांक मारली, आणि म्हटलें कीं, "हातपाय धुवा! भात झाला! सुरेखसें दहीं आहे! तोंडीं लावायला कोथिंबिरीची चटणी आहे! व म्यां आपणासाठीं बुध्यां बरोबर आणलेल्या मोतीचुरांच्या लाडवांची त्याला पुरवणी आहे!" मी हातपाय धुवून पाटावर बसलों! व तिच्या हातचे ते शेवटले दोन घांस कसेबसे घशाखालीं उतरविले! मी जेवीत असतां ती म्हणाली :—"मी वाढतां वाढतां आज फार थकून गेल्यें आहें! करितां हें उष्टें खरकटें उद्यां सकाळीं गजी आली म्हणजे आंवरील! आपण आतां जाऊन स्वस्थ निजूं!" त्याप्रमाणें माझें जेवण होतांच तिनें झांकपाक केली, व आम्ही उभयतां पलंगावर जाऊन निजलों! नवमल्लिका जशी आम्रतरूला गुरफटून घेते, तशी ती माझ्या अंगाला बिलगून मला गाढालिंगन देती झाली! मी आपल्याशीं म्हणालों! :—"हे अभाग्या! अरे, ही बाहेरून जितकी सुरेख, जितकी प्रेमळ, व जितकी पवित्र दिसते, तितकी ही आंतून असती, तर आज तुझ्या मनाला किती समाधान वाटतें? तूं किती आनंदी असतास? व तुझ्यासारखा सुखी या धरणीतलावर दुसरा कोण सांपडता?" ती ते रात्रीं माझ्याशीं पुष्कळ बोलली! आणि तेंही अगदीं निष्कपटानें! आणि खरोखर, तिचा स्वर इतका कांहीं मंजुल असे कीं, कोकिला सुद्धां त्यास लाजून यःपलाय करीत! वैद्यराज! ही अतिशयोक्ति नव्हे! पण मला तें भाषण किटकिटीप्रमाणें वाटलें! प्रेमाचा मोठा आविर्भाव आणून व शृंगार-चेष्टेचें आमिष करून म्यां तिच्या कंचुकिची गांठ सोडली! जरी मी क्रोधाच्या पूर्णपणें आधिन झालों होतों, तरी तिचा तो सुवर्णकेतकीसारखा गौरवर्ण!, ती रुंद छाति!, व तिचे ते मदनाच्या सुवर्णकलशाप्रमाणें पीन स्तन!, माझ्या मनास खरोखर आनंदविते झाले! परंतु अरेरे! स्वच्छ स्फटिकावर पडलेल्या निर्मळ चांदण्याप्रमाणें तिचें तें मृदु हृदय वरून जितकें मनोहर दिसतें, तितकेंच तें आंतून असतें, तर मीं आपल्या मनांत भलता विचार कशाला आणला असता? ते वेळीं

कुविचाररूपी सैतानानें माझ्या मनांत सुविचाराचा मुळींच प्रवेश होऊं दिला नाहीं; त्यामुळें माझा निरुपाय झाला! ती थकली होती म्हणून म्हणा, अथवा तिला ती अखेरची गाढ निद्रा लागायची होती म्हणून म्हणा; ती लौकरच झोंपी गेली! व तिनें तरी झोंपी कां न जावें? ज्याच्याविषयीं ती कांहीं काल उदासीन झाली होती, त्या म्यां तर तिला गाढालिंगन दिलेलें! शिवाय, तिच्या निष्कपटी मनांत पापांचा अंश यत्किंचितही नव्हता! तेव्हां तिला दिवसभर झालेल्या अकल्पित परिश्रमांमुळें पलंगावर लवंडतांच झोंप लागली; यांत विशेष तें कांहींच नाहीं! पण परप्राणविघातक जो मी, त्या मला झोंप यावी कोठून? घड्याळाच्या टिकटिकीखेरीज त्या भयंकर रात्रीं दुसरा कसलाही आवाज माझ्या घरांत नव्हता! चहूंकडे शुक्र होतें! सारें जग तापत्रयाच्या भयंकर व्याधींतून सुटून निद्रादेवीच्या सुखमंदिरांत आनंदानें विहार करीत होतें! मी मात्र त्या सैतानाच्या व दुर्दैवाच्या पूर्णपणें आधिन झालों होतों! अकरा वाजले! बाराचा ठोका पडला! तरी कट्यारीकडे माझा हात जाईना! इतक्यांत मला एकाएकी गुंगी लागून असें स्वप्न पडलें कीं:—"मी बाहेरून जसा घरीं आलों, आणि पहातो तों तो चांडाळ **गोपाळराव** तिच्या गळ्यांत हात घालून माझ्या पलंगावर बसला आहे! दोघे एकमेकांचे प्रेमपूर्वक चुंबन घेण्यांत इतके गर्क झाले आहेत कीं, मी त्यांच्यापुढें उभा आहें, तरी त्यांस दिसत नाहीं! तेव्हां मी फारच संतापलों, व त्या **गोपाळरावा**च्या मुसकाडींत अशी एक जोरानें भडकाविली कीं तो 'अयाई!' करीतच गाल चोळीत झर्रकन पळत गेला!" आणि मी जागा झालों! व पाहतों तों पांढऱ्या शुभ्र ढगांवर जसें अप्सरेचें चित्र काढावें, तशी ती सुंदरी त्या पलंगावरील चादरीवर शोभत आहे! गाढ निद्रेंत निमग्न झाल्यामुळें तिचीं नेत्रकमलें निमीलित झालीं आहेत! कंचुकिची ग्रंथिका तशीच सुटलेली असून तिचें तें स्तनपीनद्वय आणि आकाशासारखें निर्मळ हृदय उघडीं पडलीं आहेत! परंतु नुकत्याच भयंकर स्वप्नानें माझे सौम्य झालेले विचारही पुन्हां भयंकर झाले होते! कारण, 'मनीं वसे तें स्वप्नीं दिसे' या न्यायानें **गोपाळराव** तिचे मटामट मुके घेत आहे, हें माझ्या डोळ्यांसमोर दिसतच होतें! शेवटीं, क्रोधावेशानें मी अगदीं वेडा झालों! व "अशा अप्सरेसारख्या सुंदर स्वरूपास व्यभिचाराची कालिमा लागावी काय? हा, रांडे! भोग आपल्या पापकर्माचीं भयंकर फळें!" असें म्हणून—हाय! हाय! वैद्यराज! या पुढची माझी नीच कृति उघड करून सांगण्यास माझी लेखणी वाहत नाहीं; तेथें मी काय करूं? थोडक्यांत सांगतों कीं म्यां तिला इहलोकांतून नाहींसें केलें!!! आणि तें इतक्या अल्पावधींत कीं तिला 'अयाई!' सुद्धां म्हणण्यास म्यां कर्मचांडाळानें अवकाश दिला नाहीं! जेव्हां मी तिच्या उदरांत कट्यार भोंसकली तेव्हां रक्ताची जी जोरानें चिळकांडी उसळून उडाली, तिचा एक थेंब मात्र माझ्या हातावर उडाला! कोणत्या ठिकाणीं तो उडाला, हें आतां आपणांस सांगण्याची गरज नाहीं!

कारण, त्या ठिकाणची जागा आपण आपल्या हातानेंच दोन वेळां शस्त्रानें कापून काढली आहे!!!

ज्या रीतीनें मी आपल्या बायकोचा खून केला, त्याप्रमाणें तिच्या प्रेताचीही विल्हेवाट बिनबोभाट लाविली. **खंडू, रामा** आणि **गजी** यांना द्रव्याचे तोबरे दिल्यांमुळें ह्या बातमीविषयीं त्यांची दांतखीळ बसल्यासारखी झाली! माझ्यामागें त्यांनीं **पुण्यांत** चहूंकडे प्रसिद्ध केलें कीं, ती सर्पदंशानें मृत्यु पावली! येथील वर्तमानपत्रांत सुद्धां तिच्या अकालिक मृत्युविषयीं जे उद्गार आले त्यांत सर्पदंशाचा उल्लेख होता!

वर म्यां ज्या एका तरुण स्त्रीचा उल्लेख केला आहे, तिचेंही नांव **अहिल्याच** होतें! ती कोण? कोणाची? हें मला तोंपर्यंत पुरतेंस समजलें नव्हतें! तिचा माझ्या बायकोचे ठिकाणीं फारच विश्वास होतासें दिसतें! तिला मात्र ही सर्पदंशाची बातमी खरी वाटेना! संधि साधून तिच्या सुतकांतच ती एके दिवशीं माझ्या घरीं आली. ते वेळीं तिच्या मुद्रेवर भय, औदासीन्य, आणि आपल्या मैत्रिणीच्या वियोगानें झालेलें दुःख स्पष्ट दिसत होतें! औदासीन्य आणि दुःख हे विकार तिच्या चेहऱ्यावर दिसणें साहजिकच होतें, कारण ती तिच्या चिरपरिचयांतली होती! पण भयभीत होण्याचें वस्तुतः तिला कांहींएक कारण नव्हतें! मला वाटलें, ही स्त्री जर माझें समाधान करण्याकरितां आली असेल, तर तें ही कोणत्या रीतीनें करणार? व अशा तरुण स्त्रीनें मजकडे एकाकिनी येण्याचें कारण तरी काय? आणि खरोखर वैद्यराज! त्या अनाथ अबलेचा निर्दय होऊन जेव्हां म्यां खून केला तेव्हां मला एक प्रकारचा आनंदच झाल्यासारखें वाटत होतें! कारणः—

> **आवर्तः संशयानामविनयभवनं पत्तनं साहसानां**
> **दोषाणां संनिधानं कपटशतमयं क्षेत्रमप्रत्ययानाम्।**
> **स्वर्गद्वारस्य विघ्नो नरकपुरमुखं सर्वमायाकरण्डम्**
> **स्त्रीयंत्रं केन सृष्टं विषममृतमयं प्राणिनामेकपाशः ?**

त्या कविराज **भर्तृहरीच्या** ह्या उक्तीप्रमाणेंच माझ्या प्रियेविषयीं माझी खात्री झाली होती! धिक्कार असो त्या माझ्या खात्रीला! आम्हीच पुरुष संशयी, अविनयाचें घर, साहसाचें आगर, दोषाचे सागर, कपटसाहस्रयाचें तर केवळ क्षेत्रच! सारांश, स्वर्गद्वार प्रवेश करण्यांत विघ्न करणारी, अधोगतीस पोंचविणारी आणि सर्व मायाकरण्डक हीं जीं **भर्तृहरीनें** एकंदर स्त्रीजातीला विशेषणें देण्याचें धाडस करून विष आणि अमृतमय असा जो आम्हा मानवप्राण्यामागें लागलेला पाशच होय, तें स्त्रीयन्त्र घडविणारा तरी कोण असावा? म्हणून जे उद्गार काढले आहेत, ते त्याच्या स्वतःच्या स्त्रीचें आचरणचांचल्य जेव्हां त्याला दिसून आलें तेव्हांच्या त्याच्या अविचाराचीं फळें होत, असें निदान मला तरी ह्मणावें लागतें! स्त्रीवर्गाच्या एकंदर उत्कर्षाविषयीं जे पहिल्यापासूनच प्रतिकुल, त्यांना ही **भर्तृहरीची** उक्ति

तर केवळ 'श्रुतिस्मृति'च वाटत आहे! खुशाल वाटो. परंतु मी तुह्मांला येवढेंच सांगून ठेवतों कीं, स्त्री हें नांव जात्याच मोठें पवित्र आहे! एक स्त्री बदफैली निघाली, किंवा तिचें कांहींनीं अनुकरण केलें, किंवा एकाद्या सुशिक्षित स्त्रीनें कुमार्गगामी होऊन शिक्षणाच्या नांवास बट्टा लाविला, म्हणून जगांतील व विशेषतः **भारतवर्षां**तील एकंदर स्त्रीजातीवर तोच दोषारोप करूं पहाणें अविवेकाचें फळ नव्हे काय? स्त्री बदफैली निघाली, किंवा कांहीं तिच्या वर्तनास अनुसरल्या, अथवा एखादीनें आपल्या शिक्षणाची माती केली; तर त्या बदफैलीपणांत, अनुसरण्यांत, किंवा शिक्षणाची माती करण्यांत एका स्त्रीचाच अपराध काय? त्याचा अंश पुरुषाकडे कांहींच जात नाहीं? जातो असें जर आहे, तर वरच्यासारखे प्रलाप कशाचे दर्शक होत? अहो! एकदां तुम्हासारख्या जुन्या मताच्या पूर्णाभिमान्यांनीं एखाद्या गोष्टीविषयीं दुराग्रहाचा विडा उचलला म्हणजे तेथें प्रत्यक्ष **ब्रह्म**देव जरी आला तरी तो पैजेनें हार जावयाचा! याला प्रत्यक्ष उदाहरण माझें स्वतांचेंच ध्या! हेंच ब्रह्मज्ञान मला त्या 'अनुरागपत्रिका' पाहतांच सुचलें असतें तर आज माझ्या प्रिय सखीच्या घोरतर विरहानलांत सांपडून संतापक्वथित होत्साता मी कां बरें तरमळत पडलों असतों? पण नाहीं! भवितव्यता बलीयसी! हेंच खरें! **अथेल्लो**च्या हातून जसा त्या निरपराधी **डेस्डीमोने**चा अंत व्हावयाचा होता, तसाच माझ्याही हातून माझ्या प्रियेचा शेवट लागावयाचा होता कीं काय नकळे! अथवा तोच **अथेल्लो** आणि तीच **डेस्डीमोना** आह्मां स्त्रीपुरुषांच्या रूपानें ह्या **पुण्य**ग्रामीं पुन्हां अवतीर्ण झालीं नसतील कशावरून? हर! हर! —अहो! पण मी असा वेड्यासारखा बहकत काय सुटलों? आज मी जें हें खऱ्या पश्चात्तापाचें अथवा महामूर्खपणाच्या अविवेकाचें व्याख्यान झोडीत बसलों आहे त्याची मूळपिठिका तर मी अजिबात सोडून दिली! वैद्यराज! ती **अहिल्या** जेव्हां मजकडे आली तेव्हां खरोखर मी बुचकळ्यांत पडल्यासारखा झालों! आज माझ्या पापकृतिमुळें माझ्या स्वरूपांत पडलेला फरक जसा आपणांस सहज ताडतां येण्याजोगा आहे, तसाच फरक तेवेळीं त्या **अहिल्ये**च्या स्वरूपांत मला स्पष्टपणें दिसत होता! ती निस्तेज होऊन काळीठिक्कर पडली होती! व वरून, सदाचाराचा आंव घालणाऱ्याचीं आंतील एकंदर पापकृत्यें बाहेर पडतांच तो जसा भयचकित होऊन बुचकळ्यांत पडल्यासारखा दिसतो, तोच प्रकार मला **अहिल्ये**च्या ठिकाणीं उघड उघड दिसत होता! पण मला त्या तिच्या भयचकिततेचा तेवेळीं कांहींच उमज पडेना! जरी मी दुःखी कष्टी होतों तरी मजकडे येण्याचें कारण मी तिला मोठ्या नम्रतेनें विचारलें! त्याचें उत्तर तिनें मला वाग्बाणांनीं ताडन करीतच दिलें! ती म्हणाली:— "तुह्मी मोठे अविवेकी, उतावीळ आणि साहसी आहां! तुमच्यासारखा निर्दय प्राणी मी या जगांत पाहिला नाहीं!" त्यावर मी ह्मटलें:—"अहो! मीं असें केलें तरी काय? काय पाहून तुह्मी मला निर्दय ह्मणतां? आणि तुह्मांस मला निर्दय

म्हणण्याचा अधिकार तरी कसा पोंचतो? तुमची माझी ओळखदेख कांहीं नाहीं! फक्त एकदांच काय तें म्यां तुम्हांस पाहिलेलें आठवतें! असें असून तुह्मी मजवर जें विनाकारण तोंडसुख घेतां तें काय म्हणून?" हें माझें भाषण ऐकतांच तिच्या डोळ्यांतून घळघळ अश्रुधारा वाहूं लागल्या! कंठ दाटून आला! व तिला शोकाचे हुंदक्यावर हुंदके येऊं लागले! तेव्हां ती रडव्या स्वरानेंच अडखळत म्हणाली कीं:— "काय? विनाकारण मी तुम्हांवर तोंड सुख घेत्यें? अहो! विनाकारण मी तुमच्यावर कशी आग पाखडीन? त्याला कारण आहे हो कारण आहे! आणि तें कारण तुह्मीच!" मी मग भयभीत होऊन ह्मटलें:—"काय? मीच?" "होय! होय! तुह्मीच! तुह्मीच!" ती आवेशानें ह्मणाली:—"त्या निरपराधी प्राण्याच्या ऐवजीं आपणच माझा कंठनाल चरचरां कापला असता तर खरोखर पृथ्वीचा भार फारच हलका झाला असता! ती पवित्र माउली—माझी जिवलग मैत्रीण,–मैत्रीण ह्मणण्यास मला लाज वाटते! —आणि सख्खी आते बहिण– तुमच्याच विचारशून्य कृतीनें आयुष्य असतां परलोकवासी झाली! हाय! हाय! माझीं कुकर्मे झांकणारी माझी प्रिय **अहिल्या** तुह्मीच ठार मारली यांत संशय नाहीं!" वैद्यराज! ह्या तिच्या कठोर वाग्वज्रानें माझ्या धैर्यमेरूचे किती तुकडे केले असतील, व तेवेळीं माझी कशी स्थिती झाली असेल? याचा आपणच विचार करा! तथापि त्या नामशेष धैर्याचाच अवलंब करून म्यां तिला ह्मटलें:—"काय हें भलतेंच तुम्ही बडबडतां? खरोखर, माझी बायको फार चांगली होती! पण सर्पदंशानें ती अल्पायु झाली तेथें कोणाचा उपाय?" "काय सर्पदंश?" ती पुन्हां रागानें म्हणाली:— "अहो तो सर्प तुम्हीच! तुम्हीच तिला दंश करून ठार मारली! खरा सर्प इतका दुष्ट नसतो! तो तुमच्यासारखा, निरपराधी प्राण्यास कधींच दंश करणार नाहीं!" हें तिचें वाक्य माझ्या तर फारच वर्मीं लागलें! तथापि पुन्हां म्यां धैर्याचा आव घालून तिला ह्मटलें:— "तुम्ही काय ह्मणतां हें मला मुळींच कळत नाहीं!" "ऐका तर; मीच तुम्हाला कळवितें खरें काय आहे तें!" ती म्हणाली:—"तुम्ही कसेंही झालें तरी परपुरुष आहां! व मी परस्त्री आहें! तेव्हां माझ्यासारखीनें तुमच्याशीं फार वेळ एकांत करणें सर्वथैव अनुचित आहे; हें मी जाणत्यें! पण 'खरा प्रकार' उजेडांत आणल्याखेरीज रहाववत नाहीं; तेथें माझा निरुपाय आहे! तुमची बायको लहानपणीं जेव्हां आपल्या माहेरीं असे, तेव्हां तिनें व म्यां एके ठिकाणीं खेळावें सवरावें! तेव्हांपासून तिची माझी गट्टी जुडली! पण एकाच बुरुडाच्या हातच्या घडलेल्या दोन पाट्या असल्या, तरी कर्मवशात् एक नाना प्रकारच्या सुगंधशीतल पुष्पांनीं परिप्लुत होत असल्यामुळें आदरणीय व परम पवित्र होते! व तिचीच दुसरी बहिण मलमूत्र वहाण्याचें साधन होतें!! त्याप्रमाणें माझ्या अहिल्येच्या नशिबानें तिला आपल्यासारखा समवयस्क व सद्गुणी नवरा मिळाल्यानें ती सर्व सद्गुणांची पुतळी बनली! व पैशाकडे लक्ष देऊन माझ्या आईबापांनीं मला एका जरठाच्या

पदरीं बांधून माझा मांसविक्रय केला! त्यामुळें मी मूर्तिमंत 'नरकपुर' बनल्यें! अतएव कामाच्या पक्षपातपणामुळें मी सर्वथैव पराधिन झाल्यें! नवऱ्याच्या चोरून मी आपल्या प्रियकराशीं जो पत्रव्यवहार करीत असे, व त्याचीं जीं उत्तरें येत असत, तीं सर्व मी तिजजवळ लपवून ठेवण्यास देत असे! कारण, माझ्या एकंदर वर्तणुकीवर माझ्या नवऱ्याचें जसें बारीक लक्ष आहे तसें फारच थोड्या विजोड जोडप्यांत गणल्या जाणाऱ्या नवऱ्यांचें त्यांच्या बायकांवर असेल! तुमच्या बायकोवर माझा फार विश्वास असे! व त्याप्रमाणें ती विश्वासपात्रही पण होती! कारण, माझें रहस्य तिनें कधींच बाहेर पाडलें नाहीं! फार तर काय? पण म्यां तिजजवळ दिलेल्या पत्रांत काय आहे, याची सुद्धां तिनें कधीं चौकशी केली नाहीं! व याची प्रचीतिही म्यां पुष्कळदां घेतली आहे! आपण येथें आहां हें मला माहीत नव्हतें! परंतु सुमारें दोनतीन महिन्यांपूर्वीं तुमच्या बायकोची व माझी सहज **तुळशीबागेंत** गांठ पडली! तेव्हांपासून तुह्मी घरीं नसलां म्हणजे मी नवऱ्याला सांगून कधीं कधीं येथें येत असे! आपल्या दृष्टीं काय ती मी एकदांच पडल्यें! असो. पांचसहा दिवसांपूर्वीं तुमची बायको जेव्हां आमच्या येथें जेवायला आली, तेव्हांच तिनें तुमच्यांत झालेली विलक्षण चलबिचल माझ्या कानावर घातली! खरेंच, ज्या सृष्टिकर्त्यानें हें प्रचंड विश्व निर्माण केलें, त्या दीनदयाळ परमेश्वरानें सर्व स्त्रियांचा व पुरुषांचा चेहेरा एकसारखा केला नाहीं, किंवा त्या स्त्रीपुरुषांपैकीं सुदैवानें ज्यांना पांढऱ्यावर काळें करण्याची शक्ति प्राप्त झाली आहे, त्या सर्वांचींच हस्ताक्षरें एकसारखीं केलीं नाहींत, ही मोठ्या सुदैवाची गोष्ट समजली पाहिजे. नाहींतर तुमच्यासारखे, मिथ्या संशयानें, जे अविवेकी पुरुष भ्रमित झाले आहेत, किंवा दुराग्रहपटलानें ज्यांची ज्ञानदृष्टि अंध झाली आहे, त्यांचे हांतून माझ्या परम प्रिय **अहिल्येसारख्या** सत्वशील, शांत, पतिरत व साध्वी स्त्रिया रोजचे रोज किती आपल्या अमोल प्राणांस मुकल्या असत्या, तें एक परमेश्वरच जाणे! तथापि, माझ्या मतें त्यानें एक गोष्ट फार अनुचित केली आहे! व ही अनुचित गोष्ट प्रचलित करण्यांत त्याचा कोणता हेतु असेल तो असो! ती गोष्ट ही कीं, त्यानें प्रत्येक गोष्टीस निदान एकेक तरी अपवाद ठेवला आहे! तो तसा अपवाद त्यानें ठेवला नसता, तर आज असा हा दुर्धर प्रसंग आलाच नसता! म्हणजे तुह्मांला प्रत्यक्ष **अहिल्येसारख्या** पवित्र असणाऱ्या स्वस्त्रीची हत्या घडली नसती, व मलाही माझ्या प्रिय मैत्रिणीचा चिरकालिन विरह झाला नसता! दुर्दैवानें आम्हां दोघींचें जसें नामसादृश्य जुळविलें! तसें त्यानें आमचें हस्ताक्षरसादृश्यही जुळविलें ही गोष्ट फार वाईट झाली! माझें वर्तन जितकें वाईट आहे तितकेंच माझें अक्षर वाईट असतें, तर माझ्या आनंदास पारच नसता! परंतु हाय! हाय! विधिलिखितापुढें कोणाचें चालत नाहीं, असेंच म्हणून स्वस्थ बसावें दुसरें काय! तथापि, आपल्यासारखे

सद्गुणी भ्रतार व तिच्यासारखी एकनिष्ठ पत्नी असल्यामुळें माझें रहस्य असें बाहेर पडून तें तिच्या अपघातास कारण होईल असें मला वाटलें नव्हतें! असो. झालें तें बरेंच झालें! माझ्या 'अनुरागपत्रिका' मला आतां परत द्या, म्हणजे मी आपली जातें!"

वैद्यराज! दुःखाचे हजारों ढग गडगडावे! त्यांतून क्लेशाची वीज वारंवार कडकडून ठिकठिकाणीं तिचा प्रपात व्हावा! धैर्यतरु उन्मळून पाडणारें शोकाचें प्रचंड वावटळ सुटावें! आणि त्यानंतर कंठ मोकळा करून आक्रंदनाची वृष्टि व्हावी! त्याप्रमाणें माझी स्थिति झाली! **सीता**वियोगानें विरहाकुल झालेल्या **रामचंद्रा**कडून, प्रत्यक्ष पाषाणांसही द्रविवणाऱ्या ज्या उक्ति **भवभूती**नें वदविल्या त्यांचा, मला वाटतें, माझ्या दुःखापुढें कांहींच निभाव लागणार नाहीं! **सीते**चा वियोग जरी 'निरवधि' होता तथापि ती जिवंत असून तिच्या पुनर्भेटीची **रामचंद्रा**ला आशा होती! पण मला 'आशा' हा शब्द तरी उच्चारावयास जागा आहे काय? तेव्हां त्या स्त्रीचें हृदयद्रावक भाषण ऐकून माझें दुःख कितीपटीनें दुणावलें असेल हें कां मी अंकगणिताचें साह्य घेऊन आपणांस हिशेबवार सांगितलें पाहिजे? तथापि, आज माझें मलाच आश्चर्य वाटतें कीं, तेवेळीं मी चरकांत घातल्या जाणाऱ्या गाईप्रमाणें दुःखानें हंबरडा कसा फोडला नाहीं? असो. मोठ्या कष्टानें मी आपल्या छातीवर धोंडा ठेवून सद्गदित कंठानें म्हटलें:—"त्या अनुरागपत्रिकांस कांहीं खूण आहे काय?" तीही साश्रु म्हणाली कीं:—"त्या सर्व हरणाच्या कांतड्याचें एक सुंदर 'पाकिट' आहे, त्यांत आहेत. कांतडें घोटघोटून त्याला किरमिजी रंग आणला आहे! त्यावर चाऱ्ही बाजूंनीं सुंदर वेलपत्ति काढलेली आहे? चाऱ्ही कोपऱ्यांवर सुरेख फुलें असून मधीं माझें सोन्याच्या अक्षरांनीं नांव लिहिलें आहे! शिवाय, त्यास गुंडाळण्याकरितां कलाबतुचा एक सुंदर गोफही आहे!" हें तिचें भाषण ऐकतांच मी तर मेल्यापेक्षां मेला झालों? आधींच माझी मुद्रा उदासीन झाली होती! आणि तींत तिनें आपल्या वाग्शरांनीं आणखी ताडण केलें! तथापि, त्या बाणाचे ते व्रण तिला न दाखवितां तसाच उठून मी आपल्या प्रियेच्या टेबलाकडे गेलों! जातांना मात्र म्यां तिला साशंक मुद्रेनें विचारिलें कीं, त्या "सौभाग्यवति **अहिल्याबाई**" तुह्मीच काय? ती ह्मणाली:—"होय! आपल्या पातिव्रत्यधनावर दिवसाढवळ्या किंवा वाटेल तेव्हां **गोपाळराव** नामक वंचकास दरवडे घालूं देणारी **अहिल्या** ती मीच! माझें पाप उघडपणें कबूल करण्यास मला आज कोणाचीच भीति वाटत नाहीं!" हें तिचें निर्भीडपणाचें भाषण म्यां ऐकलें, तेव्हां मात्र माझ्या डोळ्यांतून अश्रूंचे बिंदु टपटपां पडूं लागले! परंतु मोठ्या कष्टानें तेही म्यां उत्तरीयानें सांवरून धरलें! आणि त्या स्त्रीच्या त्या "अनुरागपत्रिकां"चें पाकिट आणून तिच्या

हवालीं केलें. तें तिच्या हातांत पडतांच ती तडक आपल्या घरीं चालती झाली! आणि मी मात्र दुःखार्णवाच्या भयंकर वादळांत गटांगळ्या खाऊं लागलों! वैद्यराज! जेव्हां ती स्त्री त्या "अनुरागपत्रिका" घेऊन माझ्या घराबाहेर पडली, तेव्हांच माझ्या दुःखाचें बीज नाहींसें झालें! परंतु तो रक्ताचा थेंब माझ्या उजव्या हातावर ज्या ठिकाणीं उडाला, तेथचें मात्र दुःख अझून कमी झालें नाहीं, व होणारही नाहीं! सध्यां त्या जागेवर दुःखाग्नि इतका कांहीं जोरानें भडकत आहे कीं, त्यापुढें तक्षकराजाचा दंश कांहींच नाहीं! रक्ताचा आरक्तपणा नाहींसा झाला पण त्या दुःखरूपी तरूचें मूळ मात्र आपलीं पाळीं आणखी खोल खणून दूरवर नेऊं लागलें! सारांश, त्या जळजळण्यापासून मला फारच दुःख होत आहे. तें फार भयंकर असून कांहीं केल्या कमी होत नाहीं! व होणार नाहीं! मला त्या दिवसापासून झोंप कशी ती मुळींच नाहीं! पण यदाकदाचित् जर मला कधीं नकळत गुंगी आली तर त्या गुंगींत सुद्धां त्या दुःखाच्या वेदना मला अत्यंत कासावीस करतात! वैद्यराज! या एकंदर पत्राच्या झोंकावरून माझें मन मला किती खात असेल? व त्यापासून मला किती दुःख होत असेल? हें मी तुह्मांस पुनःपुन्हां सांगत नाहीं! त्याचा अनुभव तुह्मांला दोन वेळां आलाच आहे! परंतु ज्याअर्थीं त्याच वेदना तिसऱ्यानें उलटल्या आहेत, त्याअर्थीं त्या माझा शेवट केल्याखेरीज राहणार नाहींत, असें वाटतें! त्यांच्या तावडींतून आपण मला दोनदां वांचविलें! पण ह्या वेळेस मात्र कोणाचाच उपाय चालणार नाहीं असें वाटल्यावरून मीच आपणांकडे आलों नाहीं! हें शेवटचें पत्रच आपणांस, आलें तसें वेडेंवांकडें लिहून, धाडिलें आहें! कारण, जी स्त्री माझ्याकडे त्या "अनुरागपत्रिका" मागण्यास आली, तीच स्त्री— "सौभाग्यवति **अहिल्याबाई**"—मी आपणांकडे जेव्हां दोनदां आलों, तेव्हां त्या दोनही वेळां आंतून डोकडोकावून मजकडे पाहतांना मला ओझरती दिसली! तेव्हां माझ्या दुःखाचें मूळ बीज कांहीं अंशीं तीच असल्यामुळें मला कृतकर्माचें कसें काय दुःख होत आहे, याची थोडीशी तरी तिला कल्पना करतां यावी! आतां तिनें त्या पत्रिका माझ्या बायकोजवळ विश्वासानें ठेवण्यास दिल्या. हा तिनें मोठा अपराध केला असें नाहीं! कारण, पुढें होणाऱ्या भयंकर परिणामाची तिच्या मनांत कल्पना सुद्धां आली नव्हती, हें तिनेंच मला प्रत्यक्ष बोलून दाखविलें! तिचें अक्षर सादृश्य आणि नामसादृश्य यांनींच माझा मोठा घात केला! अथवा मीच मूर्खांतला मूर्ख, म्हणून अविवेक पिशाचिकेच्या आधिन होऊन त्या बिचाऱ्या साध्वीचा व्यर्थ प्राण घेतला! वैद्यराज! आतां मी आपलें समाधान कसें करून घ्यावें? हाय! हाय! ती पहा! माझी प्रियाच सचेतन होऊन आज माझ्यापुढें जशी कांहीं उभी आहे! माझी ही अनुकंपनीय स्थिति पाहून त्या बापडीला पहा कसा गहिंवर आला आहे तो! अहाहा! तिची रम्य मूर्ति माझ्या कल्पनामंदिरांत आज कशी निश्चल उभी आहे! अरे! पण—तिचे ओंठ हलतात! ती आपल्याशींच

कांहीं पुटपुटत आहेसें वाटतें! प्रिये! हे मत्प्राणसंजीवन सुंदरी! काय ह्मण-
त्येस तूं?:—

### श्लोक

होत्यें आजवरी विभक्त तुमच्या नाथा! शरीराहुनी!।
"अर्धांगीं प्रिय आमची" ह्मणत हो! होतां मला वाहुनी! ॥
"सर्वांगीं" तुमच्या परंतु भिनल्यें मत्पूर्वपुण्यामुळें!।
युष्मन्मानसमंदिरीं ह्मणुनि मी येऊनियां राहिल्यें! ॥ १ ॥
नाहीं मी हलणार तेथुनि कधीं—त्या सौख्यधामांतुनी!।
दुर्दैवें जरि आगळीक घडली माझ्या प्रिया! हातुनीं! ॥
होत्यें अंतरल्यें क्षणैक तुमच्या सेवेस त्या दुर्दिनीं ।
त्या रोषें झिडकारुनी मज नका लावूं प्रिया! ये दिनीं! ॥ २ ॥

छे! छे! तुला मी आतां 'झिडकारून' कसा लावीन? व मी आपल्या हृदयमंदिरांतून तुला दूर तरी कसा करीन? परंतु हाय! हाय! तुझें हें सरळ व निर्मळ आणि प्रेमळ व रसाळ भाषण उदात्त, गंभीर व लीन असूनही माझ्या हृदयाचें पाणीच करतें! येवढा मोठा अक्षम्य माझा अपराध! पण त्याची तूं किती दयाळुपणानें क्षमा केली आहेस? म्यां दुष्टानें 'त्या दुर्दिनीं' तुझा प्राण घेतला असूनही तूं माझ्या हृन्मंदिरांत वास करूं लागलीस! केवढा तुझा थोरपणा हा! तूं खरोखरच उदारधी होस यांत संशय नाहीं! म्यां प्रत्यक्ष तुझा खून केला असूनही बळेंच तूं माझ्या हृदयमंदिरांत घुसत्येस! केवढें मजवर तुझें प्रेम हें? माझ्या अपराधाचें स्वरूप परम भयंकर, ह्मणजे देहान्त शासनासच योग्य, असें असूनही तूंच आपली "आगळीक" पुढें आणत्येस! केवढा तुझा लीनपणा हा, नाहीं बरें? प्रियतमे! अगे जीवींच्या जीवलगे! मी आपल्या हृन्मंदिरांतून तुला कधीं कधीं दूर करणार नाहीं! मी खुनशी, कपटी, संशयी वगैरे सर्व कांहीं असून मेल्यानंतर सुद्धां माझ्याशीं तुझें असें हें थोरपणाचें वर्तन असणें, ह्मणजे त्वां आपल्या असह्य उपकार भारानेंच मला मारणें होय! घे! हातीं शस्त्र घे! आणि माझा तूंच शिरश्छेद कर! मी त्याच योग्यतेचा आहें! असो! वैद्यराज! 'अनुरागपत्रिका' व्याख्यान संपलें! सबब पुरें करितों! ईश्वर आपलें कल्याण करो! लोभ असावा हे विनंति.

आपला सेवक,

**गौतमराव बापुजी महात्मे.**

वैद्यराज हें पत्र घडघडां वाचून त्याची घडी करूं लागले व दीर्घ श्वासोच्छ्वास सोडीत उदास मुद्रेनें चहूंकडे पाहूं लागले! आपल्याला आंतील मजकुराशीं फारसें कर्तव्य नाहीं असें त्यांना प्रथमतः वाटलें होतें! तथापि, त्यांच्या मनांत यायची ती एक विचित्र शंका येऊन गेलीच होती.

परंतु तिचें तें निराकरण करतात न करतात, तोंच त्यांचे मध्य घरांत धप्पदिशीं कसलासा आवाज झालेला त्यांना ऐकूं आला! त्याबरोबर ते दचकून उठून घरांत जाऊन पाहूं लागले, तों त्यांचीच तरुण स्त्री उरांत खंजीर खुपसून निचेष्ट पडलेली त्यांना दिसली!!! रक्ताचा पाट वेगानें वाहूं नये ह्या हेतूनें असेल, किंवा दुसऱ्या कांहीं हेतूनें असेल, तिनें आपला डावा हात त्या जखमेवर ठेवून उराशीं धरला होता! असा हा भयंकर प्रकार पहातांच वैद्यराज फार घाबरले! परंतु धीर धरून मोठ्या कष्टानें त्यांनीं तो खंजीर तिच्या उरांतून बाहेर काढला! ती जखम इतकी मोठी, जबर व खोल होती कीं, खंजीर बाहेर काढतांच तिला वायूचा झटका होऊन तिची वाचाच बसली! एकदोन असामींच्या मदतीनें वैद्यराजांनीं तिला उचलून घोंगडीवर घातली! आणि तिचे दोन्ही हात व्यवस्थेनें नीट करून ठेविले! तों तिच्या डाव्या हाताची मूठ झांकलेली आहे, असें त्यांनीं पाहिलें! तेव्हां ह्या मुठीचा व हिच्या या भयंकर हत्येचा तर कांहीं संबंध नसेल ना?" अशी त्यांच्या मनांत शंका येऊन त्यांनीं ती मूठ उघडून पाहिली! तों तें "सौभाग्यवति **अहिल्याबाई**"च्या "अनुरागपत्रिकां"चें 'पाकिट' आहे असें त्यांना दिसून आलें!!! वैद्यराज ज्ञातारे होते, तथापि आपली स्त्री अशा प्रकारची दुराचारी आहे, असें त्यांना समजतांच त्यांची तब्यत गरम झाली! आणि रागानें तिला ते कांहीं प्रश्न करूं लागले! परंतु उत्तर नाहीं! येईल कोठून? आपल्या पापाची झडती देण्यास ती तेच वेळीं **यमाजी भास्करा**चे दरबारांत चालती झाली!!! दुसरेच दिवशीं वैद्यराजांकडे एक वर्तमानपत्र आलें; त्यांत पुढील मजकूर होता:—

"**आत्महत्या !**—ह्या जगांत विश्वास ही एक मोठी अजब चीज होय! तो एकदां उडाला म्हणजे त्याबरोबर प्रत्येक वस्तूवरचें मनुष्याचें मनही उचल खातें! ' मनानें एकदां उचल घेतली, म्हणजे त्याच्यामागें एक दुराग्रहपिशाचिका लागत असते! ह्या पिशाचानें त्याला एकदां पछाडलें, म्हणजे तो मनुष्य विद्वान् असो, अविद्वान् असो, किंवा शहाणा असो अथवा मूर्ख असो; त्याच्या हातून पुढें कोण कोणते अनर्थ घडून येतील, हें सांगणें कठीण आहे! कारण, त्या पिशाचापुढें मनाची सुसंस्कृतता, स्वतंत्रता, व विवेकता ह्यांचें कांहींच चालेनासें होतें! **मि० गौतमराव बापुजी महात्मे**, हे किती विद्वान्, थोर व परोपकारी होते हें आमच्या वाचकांस नव्यानें सांगितलें पाहिजे असें नाहीं! अशा शांत मनाच्या लोकोत्तर पुरुषाच्या हातून जर आत्महत्या होऊं लागली, तर विद्वत्ता, थोरपणा, परोपकार वगैरेंनीं कोणाचा आश्रय पहावा? **मि० महात्मे** चांगले सुशिक्षित असून लोककल्याणेच्छु होते! अज्ञानांधकारांत निमग्न झालेल्या स्त्रीवर्गास "ज्ञानप्रकाशांत" आणण्याचा तर त्यांनीं विडाच उचलला होता! व विशेषत: त्याच हेतूनें त्यांनीं आपलें बिऱ्हाड आमच्या **पुण्यग्रामींच** कायम केलें होतें! यांनीं समाजरचना, संसारयात्रा, स्त्रीशिक्षण वगैरे विषयांवर निरनिराळीं सुरेख पुस्तकें लिहिलीं आहेत! आमच्या पत्रास

त्यांचें फारच साह्य होतें. तेव्हां ते या पत्रास आपल्या लेखणीनें सवडीनुसार पवित्र करीत असत हें सांगणें नकोच! ते जातिवंत **मराठे** होते. तथापि, त्यांनीं "गुलामगिरी"च्या वर्गांत सामील होऊन ब्रह्मद्वेष कधींच केला नाहीं! अशा होतकरू विद्वानानें आत्महत्त्या करून परलोकास जाणें आमच्या समाजाचें, व विशेषतः आमच्या भगिनींचें, परम दुर्भाग्य होय! आत्महत्त्येचें कारण अझून नीटसें समजलें नाहीं! परंतु आमचें कर्णपिशाच आमच्या कानांत नुकतेंच गुणगुणून गेलें कीं, सुमारें तीन साडेतीन महिन्यांपूर्वी ज्या सुशिक्षित व विनयवति स्त्रीच्या अकालिक मृत्युविषयीं आमच्या व इतर पत्रांतून बातमी प्रसिद्ध झाली होती, त्या **सौ० अहिल्याबाई, मि० महात्मे** यांची सुशील पत्नी, होत! ह्या बाईचीही विद्वत्ता त्यांच्या वयाच्या मानानें असाधारणच होती! "आमच्या प्राचीन स्त्रिया व त्यांचें पातिव्रत्य" या मथाळ्याखालीं आमच्या पत्रांतून जी सुरस कादंबरी प्रसिद्ध झाली आहे ती याच अल्पवयी विदुषीच्या गोंडस हातांतून उतरलेली होती! अशा सद्गुणी स्त्रीच्या वर्तनाचा **मि० महात्मे** यांस संशय आल्यावरून सहा साडेसहा महिन्यांपूर्वी त्यांनीं तिला ठार मारली! पण पुढें ती माउली निर्दोषी होती असें जेव्हां त्यांना दिसून आलें तेव्हां त्यांस कृतकर्माचा फारच पश्चाताप झाला! त्या पश्चात्तापानें ते झुरणीसच लागल्यासारखे झाले! व शेवटीं स्वस्त्रीहत्त्येचें पातक जेव्हां त्यांना सहन होईनासें झालें तेव्हां त्यांनीं जी कट्यार आपल्या बायकोच्या काळजांत भोंसकून तिचा प्राण घेतला! तीच कट्यार त्यांनीं आपले छातींत मारून इहलोकचा संबंध तोडला!!! शिव! शिव! **मि० महात्मे** यासारख्या विद्वान् ह्मणविणाऱ्या पुरुषांसही जर सुशिक्षित स्त्रियांच्या सद्वर्तनाचा संशय येतो, तर दीड हळकुंडानें पिंवळे होणाऱ्या "वैभवानुयायी" मंडळींनीं "स्त्रीशिक्षणाचा परिणाम व्यभिचार व खून" अशीं अनर्थोत्पादक विधानें ठोकून दिलीं, तर त्यांत त्यांचा काय बरें अपराध? आम्ही तर असें ह्मणतों कीं, सध्यांच्या मानानें आमचा भगिनीवर्ग सुशिक्षित होईल, तर देशोन्नतीचा काल फार लांब आहे असें ह्मणण्यास मुळींच जागा राहणार नाहीं. असो. **मि० महात्मे** व त्यांच्या निरपराधी स्त्रीचा खून, ही हकीगत अत्यंत चटकदार असून हृदयद्रावक आहे. ती सवडीनुसार वाचकांस सादर करण्याचा आमचा विचार आहे. तूर्त त्या दुर्दैवी स्त्रीपुरुषांच्या आत्म्यांस चिरकाल शांति मिळो अशी परमेश्वराची प्रार्थना करून हा मृत्युलेख संपवितों."

## भारतभाग्योदय

(अथवा नागपूर येथें भरलेल्या ७ व्या राष्ट्रीयसभेचें साद्यंत वर्णन).

ह्यांत ७ व्या राष्ट्रीयसभेचें साद्यंत वर्णन अति प्रेमळ व चटकदार भाषेंत लिहिलें आहे. तें वाचलें असतां सभेचा अपूर्व व मनोहर देखावा मूर्तिमंत दिसूं लागतो. सर्व वक्त्यांचीं भाषणें दिलीं असून त्या त्या वेळचें सभेचें रमणीय स्वरूप फारच कुशलतेनें वर्णिलें आहे. नागपूर एथील लोकप्रिय व सुप्रसिद्ध सद्गृहस्थ मि. नारायणस्वामी नायडू यांस हें पुस्तक समर्पण केलें असून प्रारंभीं त्यांचें सचित्र मनोरम चरित्रही दिलें आहे, व शेवटीं मागील ६ सभांची माहिती देऊन सुंदर कविताही घातल्या आहेत. त्यामुळें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें आहे.

सांचा डेमी अष्टपत्री. पृष्ठें ७५. किं. १ प्रतीस २ आणे, ट. ह. ०॥ आणा.

## भारतकीर्तिध्वज

(अथवा अलाहाबाद येथें भरलेल्या ८ व्या राष्ट्रीयसभेचें साद्यंत वर्णन).

ह्यांत ८ व्या राष्ट्रीयसभेचे साद्यंत चटकदार वर्णन दिलें आहे. त्यामध्यें समारंभाची एकंदर हकीगत–जी कधीं कोणाच्या मुखांतून ऐकण्यास मिळण्याचा फारसा संभव नाहीं–ती सर्व अत्यंत मनोरम भाषेंत प्रेमल अंतःकरणानें 'भारतभाग्योदय' नामक पुस्तकाच्या कर्त्यांनींच लिहिली आहे. ती हृदयद्रावक हकीगत वाचून राष्ट्रीयसभेविषयीं मनांत प्रीति उत्पन्न न होणारा मनुष्य विरळा.

सांचा डेमी अष्टपत्री. पृष्ठें ५० किं. १ प्रतीस २ आणे, ट. ह ०॥ आणा.

## १ आनरेबल दादाभाई नवरोजी, एम्. पी., ह्यांचें सचित्र चरित्र.

सांचा डेमी अष्टपत्री. पृष्ठें ३२. किंमत ०।॥ आणा, ट. ख. ०॥ आणा.

## २ आनरेबल पंडित अयोध्यानाथ ह्यांचें चरित्र.

सांचा डेमी अष्टपत्री. पृष्ठें १२. किंमत ०॥ आणा. ट. ख. ०॥ आणा.

## ३ प्रिन्सिपाल वामन शिवराम आपटे, एम्. ए., ह्यांचें सचित्र चरित्र.

सांचा डेमी अष्टपत्री. पृष्ठें १२. किंमत ०॥ आणा, ट. ख. ०॥ आणा.

वरील तिन्हीं चरित्रें एकदम घेणारांस ट.ख.सह किंमत फक्त ३ आणेच पडेल.

---

### महाराणी व्हिक्टोरिया व ब्राडला ह्यांच्या चित्रांसह. अनेक उपयुक्त माहितीचें पाकेट पुस्तक.

ह्यांत फिर्यादीस व कर्जखतास लागणारे स्टांप, खानेसुमारी, व्याज, इन्कम टाक्स, पगार आकारणीचीं कोष्टकें, हिंदुस्थानांतील बड्या अधिकाऱ्यांचे पगार, तार, टपाल व रेलवेसंबंधी माहिती, इ. इ. उपयुक्त विषय आहेत.

सांचा रायल ३२ पेजी. पृष्ठें ४०, किं. २ प्रतींस ट. ह. सह फक्त १ आणा. ५ प्रतीस ट. ह. सह किं. २ आणे. १० प्रतींस किं. ३ आणे, २५ प्रतींस ६ आणे.

पत्ता—मराठी लिटररी सोसायटी, गिरगांव पोस्ट, मुंबई.

**जुलै १८९२ तों जून १८९३ पर्यंत प्रसिद्ध झालेलें २७५ पानांचें**

हिंदुस्थान व इतर देशांतील सर्व प्रकारच्या महत्त्वाच्या बातम्यांचें

**अति स्वस्त, सुंदर व अवश्य संग्रहणीय मासिक पुस्तक.**

# मासिकवृत्तमाला अथवा विविधविषयसुधा.

सांचा डेमी अष्टपत्री. दर अंकाची पृष्ठसंख्या २४. वर्षाची ट. ख. सह वर्गणी रु. १.
जुलै १८९२ तो जून १८९३ पर्यंतच्या पहिल्या वर्षाच्या १२ अंकांत खालील
विषयांचा सवडीनुसार समावेश केला आहे :—

स्वदेशांत व परदेशांत राजकीय, सामाजिक, अथवा धर्मसंबंधीं घडलेल्या महत्वाच्या गोष्टी, संशोधक पुरुषांचे नवीन विचार, देशी संस्थानांत झालेल्या राजकीय उलाढाली व तेथील खबरबात, निरनिराळ्या प्रांतांमध्यें घडणारे नैसर्गिक चमत्कार, देशोदेशींच्या न्याय कोर्टापुढें येणाऱ्या अद्भुत खटल्यांची माहिती, वैद्यकसंबंधी महत्वाचे शोध, लोकस्थितीची हालहवाल, शिक्षणसंबंधी उपयुक्त विचार, युद्धसंबंधी बातम्या, मद्रास, बंगाल, मुंबई, वायव्य प्रांत, पंजाब, राजपुताना, वगैरे ठिकाणची खबरबात, अंमलदारांच्या जुलमी वर्तनासंबंधानें प्रसिद्ध होणाऱ्या हकिकती, कायदे कौन्सिलांतील विषय, कुटुंबीय गृहस्थांस अवश्य लागणारी माहिती, प्रसिद्ध मुत्सद्यांचे व वर्तमानपत्रकारांचे विचार, विश्वविद्यालयांतून होणाऱ्या फेरफारांची माहिती, करमणुकीचे चुटके, नामांकित स्त्रीपुरुषांची संक्षिप्त माहिती, आणि एकंदर महिन्यांत घडलेली वर्तमानें, इ. इ. इ.

जुलै १८९२ तों जून १८९३ च्या पहिल्या वर्षाच्या सुट्या १२ अंकांस—ह्मणजे २७५ पानांच्या पुस्तकास—डिसेंबर १८९३ अखेर घेणारांस ट. ख. सह १२ आणे व **बांधीव** पुस्तकास ट. ख. सह १४ आणे किंमत पडेल. ती त्यांतील येणाऱ्या नानाप्रकारच्या व मनोरंजक विषयांच्या मानानें जास्त आहे असें कोणीही ह्मणणार नाहीं. मुदतीपुढें भर—ह्मणजे रु. १—किंमत पडेल.

कोणत्याही एका सुट्या अंकास ट. ख. सह २ आणे किंमत पडेल.

---

**आतां मात्र अति स्वस्त—केवळ फुकट—ह्मटलें तरी चालेल !**

**मूळ किंमत ट. ख. सह रु. ६–८–० आहे.**

**डिसेंबर १८९३ अखेर ट. ख. सह फक्त रु. ४ च किंमत पडेल.**

## आरबी भाषेंतील चित्रयुक्त सुरस व चमत्कारिक गोष्टी.

सांचा रायल अष्टपत्री. पृष्ठसंख्या १००० पेक्षां जास्त. आंत चित्रें आहेत. टाईप उत्तम. बायंडिंग सुरेख व मजबूत. सोनेरी नांव. किं. ट. ख. सह रु. ६॥. डिसेंबर १८९३ अखेर किं. फक्त रु. ४ च पडेल. थोडयाच प्रति शिल्लक आहेत.

**पत्ता—मराठी लिटररी सोसायटी, गिरगांव पोस्ट, मुंबई.**

अपूर्व ]   लक्षपूर्वक वाचून तर पहा.   [ लाभ!

मराठी वाचतां येणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें ही संधि दवडूं नये.

**स्वस्त! अति स्वस्त!! सर्वांत स्वस्त!!! अति दुर्मिळ संधि!!!!**

डेमी अष्टपत्री सांच्याचें सरासरी ७०० पानांचें पुस्तक २ रुपये किंमतीस!

**ही केवळ स्वस्तपणाची कमालच होय!**

**इतकें स्वस्त दुसरें कोणतेंही पुस्तक नाहीं!!!**

जुलै १८९१ पासून जून १८९३ पर्यंत प्रसिद्ध झालेलें अति स्वस्त व सुंदर

# महाराष्ट्रकोकिल (मासिक पुस्तक).

सांचा डेमी अष्टपत्री. दर अंकाची पृष्ठसंख्या ३२. वार्षिक वर्गणी ट.ह. रु. १-३-०.

**जुलै १८९१ पासून जून १८९३ पर्यंतच्या दोन वर्षांच्या २४ अंकांत खालील सुंदर विषयांचा समावेश केला आहेः—**

१ सुप्रसिद्ध स्त्रीपुरुषांचीं सचित्र मनोरम चरित्रें, २ रसिक काव्यें, ३ नीतिपर निबंध, ४ विविधजनप्रदर्शन, ५ लोकोत्तर चमत्कार, ६ उपयुक्त शास्त्रीय माहिती, ७ महत्वाची व चमत्कारिक माहिती, ८ कलरव, ९ इतिहासांतील कांहीं मनोरम स्थळें, १० विद्यामंदिरांतील कांहीं गोष्टी, १० स्फुट विषय, १२ मनोरंजक आख्यायिका, १३ नवीन पुस्तकांचें परीक्षण, १४ **भारतकीर्तिध्वज** अथवा अलाहाबाद येथें भरलेल्या ८ व्या राष्ट्रीयसभेचें साद्यंत वर्णन, १५ **अनुरागपत्रिका कादंबरी**—एक संपूर्ण दुःखपर्यवसायी गोष्ट १६ **झांशी संस्थानचा संपूर्ण इतिहास**—खुद्द श्रीमंत दामोदरराव झांशीवाले—सुप्रसिद्ध झांशी संस्थानच्या अतुल पराक्रमी राणी लक्ष्मीबाईसाहेब यांचे दत्तकपुत्र—ह्यांनीं ह्या इतिहासाची माहिती दिली आहे, तेव्हां तो किती विश्वासनीय व मजेदार असेल त्याची कल्पना वाचकांनींच करावी.

वरील सुंदर व मनोरम विषय ज्यांत आले आहेत अशा पहिल्या किंवा दुसऱ्या कोणत्याही एका वर्षाचे सुटे १२ अंक—ह्मणजे डेमी अष्टपत्री ३५० वर पानांचें पुस्तक—घेणारांस डिसेंबर १८९३ अखेर ट. ह.सह किं. रु. १-१-० पडेल. त्यापुढें भर—म्हणजे रु. १-३-०-किंमत पडेल. प्रत्येक वर्षाच्या बांधलेल्या पुस्तकास ८३ आणे जास्त पडतील. कोणत्याही एका सुट्या अंकाची किं. ट.ह. सह ८३ आणे पडेल.

**पहिल्या व दुसऱ्या वर्षांचे (जुलै १८९१ तों जून १८९३ पर्यंतचे) एकदम २४ सुटे अंक—ह्मणजे सरासरी ७०० वर पानांचें पुस्तक—घेणारांस डिसेंबर १८९३अखेर ट.ख.सह किं. फक्त रु. २ पडेल. पुढें भर—ह्मणजे—रु. २-६-० किंमत पडेल. दोन्ही वर्षांचीं बांधलेलीं दोन पुस्तकें एकदम घेणारांस ट.ख.सह फक्त रु. २-४-० किंमत पडेल.**

**पत्ता—मराठी लिटररी सोसायटी,** गिरगांव पोस्ट, मुंबई.